cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–१८४ | शनिवार दि.१ नोव्हेंबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

### संपादकीय

**वेतन वाढते पण जबाबदारीचे काय?**

केंद्रीय कर्मचाऱ्यांना आठव्या वेतन आयोगाची लॉटरी लागली आहे. आयोगाच्या शिफारशी अंमलात आल्यावर वेतनात किती टक्के वाढ होईल याची आकडेवारी माध्यमांत प्रसिद्ध झाली आहे. ती कदाचित खासगी कॉर्पोरेट क्षेत्रालादेखील मागे टाकणारी ठरू शकेल.

# जूनपर्यंत होणाऱ्या शेतकरी आत्महत्यांची जबाबदारी सरकार घेणार का?

## उद्धव ठाकरे यानी मुख्यमंत्री अन् शासनाला विचारला गंभीर प्रश्न

मुंबई । प्रतिनिधी

**सरकारने कर्जमुक्तीसाठी पुढच्या वर्षी जूनचा मुहूर्त काढावा, हे चीड आणणारे व शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळणारे आहे. कर्जमुक्तीसाठी चालढकल करून हे सरकार शेतकऱ्यांना मृत्यूच्या दारात ढकलत आहे. जूनपर्यंत होणाऱ्या शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची जबाबदारी सरकार घेणार आहे काय? सरकार शेतकऱ्यांना केवळ खेळवत आहे. थोडक्यात शेतकऱ्याऱ्यांच्या आत्ताच्या हालअपेष्टा तशाच राहणार, पुढच्या जूनचा गुळ सरकारने शेतकऱ्यांच्या कोपराला लावला आहे. आत्ता आवाज करायचा नाही असेच बहुदा सरकारला सांगायचे असावे. शेतकयांना फसवण्याचचे हे खेळ बंद करा आणि अभूतपूर्व संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना न झुलवता तत्काळ कर्जमुक्त करा, असे आम्ही मायबाप सरकारला शेतकऱ्यांच्या वतीने हात जोडून सांगत आहोत, असे उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री आणि शासनाला प्रश्न विचारत गंभीर परिस्थितीची जाणीव करून दिली आहे.**



शेतकरी कर्जमुक्ती करावी या मागणीसाठी नागपूर मध्ये मोठे आंदोलन उभा केलेले बच्चू कडू आणि शिष्टमंडळाची मुख्यमंत्र्यासोबत बैठक झाली. यात पुढील ६ महिन्यात शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याचे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहे. त्यावर शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी पत्रक काढून मागणी केली आहे. की, कर्जाच्या डोंगराखाली शेतकरी खचला आहे. निसर्ग कोपलाच आहे. त्यात संवेदना नसलेल्या सरकारचा तुघलकी कारभारः अशा अस्मानी आणि सुलतानी संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना पुन्हा एकदा सरकारने लोणकढी थाप मारून वेळ काढायचा प्रयत्न केल्याची टीका उद्धव ठाकरेंनी केली आहे. कर्जमाफीवरून शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी हल्लाबोल केला आहे. त्यांनी सहा महिन्यांच्या विलंबावरून सवाल केला आहे. उद्धव ठाकरे यांनी म्हटले आहे की, कर्जाच्या डोंगराखाली शेतकरी खचला आहे. निसर्ग कोपलाच आहे. त्यात संवेदना नसलेल्या सरकारचा तुघलकी कारभारः अशा अस्मानी आणि सुलतानी संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### चंदीगडमध्ये पिटबुलसह ६ कुत्र्यांच्या जातींवर बंदी

चंदीगड:: चंदीगड महानगरपालिकेने नागरिकांच्या सुरक्षेसाठी अमेरिकन बुलडॉग, अमेरिकन पिटबुल आणि बुल टेरियरसह सहा आक्रमक कुत्र्यांच्या जातींवर बंदी घातली आहे. महानगरपालिकेने द म्युनिसिपल कॉर्पोरेशन चंदीगड पेट अँड कम्युनिटी डॉग्स बाय-लॉज, २०२५ लागू केले आहेत. पाळीव श्वान पाळणाऱ्यांसाठीही अनेक कडक नियम लागू करण्यात आले आहेत. मात्र, ज्यांच्याकडे यापैकी कोणत्याही जातीचे श्वान आधीपासूनच आहेत, त्यांना ही बंदी लागू होणार नाही, असे अधिसूचनेत स्पष्ट केले आहे. अमेरिकन बुलडॉग, अमेरिकन पिटबुल, बुल टेरियर, केन कोर्सो, डोगो अर्जेंटिनो आणि रॉटविलर या जनतेला धोकादायक ठरणाऱ्या आणि आक्रमक प्रवृत्तीच्या या सहा प्रजातींची नोंदणी किंवा त्यांना पाळण्यास चंदीगड महानगरपालिकेच्या हद्दीत बंदी घालण्यात आली आहे.

### ब्रेकऐवजी एक्सीलेटर दाबला, चौघांचा मृत्यू

यवतमाळ : जिल्ह्यातील वणी-घुग्गुस मार्गावर जन्नत सेलिब्रेशन हॉलजवळ एक हृदयद्रावक अपघात घडला. कार आणि ट्रकची जोरदार धडक झाली. या अपघातात एकाच कुटुंबातील चार जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. मुलीला कार चालवण्याचे प्रशिक्षण देताना ही घटना घडल्याचे सांगण्यात येत आहे. वणीतील लालपुलिया परिसरातील रहिवासी रियाज शेख (वय ५४) हे ट्रक दुरुस्तीचे व्यावसायिक होते आणि स्वतःचे गॅरेज चालवत होते. ते आपल्या मुलीला कार शिकवण्यासाठी घुग्गुस मार्गावर घेऊन गेले होते. कार चालवताना मुलीचे नियंत्रण सुटले आणि ब्रेकऐवजी एक्सीलेटर दाबल्याने कार दुभाजकावरून उसळून महामार्गाच्या उलट्या दिशेने गेली. समोरून येणाऱ्या ट्रकला जोरदार धडक बसली, या अपघातात कारचा पुढचा भाग पूर्णपणे चक्काचूर झाला.

### मुंबईतील खासगी कोचिंग क्लासेसची होणार तपासणी

मुंबई : मुंबई शहरात जागोजागी सुरू असलेल्या खासगी कोचिंग क्लासेसची गंभीर दखल घेण्यात आली आहे. कोचिंग क्लासची तपासणी करण्यासाठी बृहन्मुंबई महापालिकेने संबधित अधिकाऱ्यांची समिती गठित करावी आणि या समितीने १५ दिवसांत अहवाल सादर करावा असे, निर्देश विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी दिले. अभियांत्रिकी व वैद्यकीय क्षेत्रात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना आकर्षित करण्याकरिता खासगी क्लासेसकडून विद्यार्थ्यांची फसवणूक केली जाणे, मुंबईतील खासगी क्लासेसच्या यासंदर्भात पावसाळी अधिवेशनामध्ये विधानपरिषद सदस्य राजेश राठोड यांनी लक्षवेधी सुचना मांडली होती. त्यासंदर्भात सभापती प्रा.राम शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली विधानभवनात नुकतीच बैठक झाली. त्यानुसार हा निर्णय घेण्यात आला आहे.

### राज्यात पुढील ५ दिवस पावसाची शक्यता

पुणेः राज्यातील काही भागात पुढील ५ दिवस ढगाळ हवामानाह हलक्या पावसाचा अंदाज हवामान विभागाने दिला आहे. मोंथा चक्रीवादळ निवळल्यानंतर उत्तर छत्तीसगड परिसरात ठळक कमी दाब क्षेत्राची निर्मिती झाली आहे. राज्यातील काही भागात शनिवारी ढगाळ हवामानासह हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता आहे. विदर्भातील बुलडाणा, अकोला, अमरावती, नागपूर, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यात काही ठिकाणी ढगाळ हवामानासह हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता आहे. छत्रपती संभाजीनगर, जळगाव, धुळे, नाशिक, नंदूरबार तसेच रायगड, पालघर, ठाणे जिल्ह्यात काही ठिकाणी हलक्या ते मध्यम पावसाचा अंदाज आहे. तर जालना, परभणी आणि हिंगोली तसेच पुणे आणि अहिल्यानगर जिल्ह्यातही ढगाळ हवामानासह काही ठिकाणी हलक्या सरींची शक्यता आहे. रविवारी मराठवाडा, मध्य महाराष्ट्र आणि कोकणातील सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यातील काही ठिकाणी हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता आहे.

# निवडणूक आयोगाच्या विरोधात ठाकरे बंधू कोर्टात जाणार?

## मतदानावर बहिष्कारासह तीन-चार पर्यायांवर चर्चा, दोन दिवसात निर्णय

मुंबई । प्रतिनिधी

एकीकडे मतदारयाद्यांतील घोळावर मनसे आणि विरोधी पक्षांकडून मोर्चा काढण्यात येत असून दुसरीकडे कायदेशीर लढा लढण्यासाठीही पावले उचलली जात असल्याचे दिसत आहे. निवडणूक आयोगाच्या विरोधात ठाकरे बंधू कोर्टात जाण्याच्या तयारीत असल्याची माहिती सूत्रांनी दिली. येत्या दोन दिवसात त्यासंबंधी याचिका दाखल करण्यात येणार असून, मतदार यादीमधील दोष पुराव्यासह कोर्टात सादर करणार असल्याची माहिती आहे.



मतदार यादीतील घोळासंबंधी विरोधी पक्षाचे नेते कायदे तज्ज्ञांची भेट घेणार असून विविध पर्यायांची चाचपणी करण्यात येणार आहे. विरोधी पक्षांच्या नेत्यांच्या बैठकीतही त्यावर चर्चा झाली असून, कोर्टात जाण्यासह निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याच्या पर्यायावरही चर्चा झाल्याचे समजते. दरम्यान, मोर्चात सहभागी होणाऱ्या पक्षांनी मोर्चाची जोरदार वातावरणनिर्मिती केल्याचे दिसत आहे. त्याचाच एक भाग म्हणून राज ठाकरेंनी गुरुवारी मुंबईत मनसे पदाधिकाऱ्यांचा मेळावा घेतला. यावेळी त्यांनी निवडणूक आयोग आणि केंद्र तसेच राज्य सरकारवर ▶▶ पान २ वर

# वा प्रकाश दादा वाह!

## राजकीय वारसदार पुतण्या मग सत्तेच्या खुर्चीवर मुलगा कसा?

माजलगाव । प्रतिनिधी

गेली चार ते पाच टर्म माजलगाव विधानसभेचे प्रतिनिधित्व करणाऱ्या आमदार प्रकाश दादा सोळंके यांनी मागील विधानसभेवेळी माझा राजकीय वारसदार पुतण्या जयसिंग सोळंके असल्याचे जाहीर केले, पण स्वतः निवडणुकीला उभे राहिले. आताही त्यांनी पुन्हा तोच पाडा गिरवला. मग पुतण्या राजकीय वारसदार असेल तर स्वतःच्या कारखान्याच्या चेअरमन पदी स्वतःच्या मुलाऐवजी पुतण्याला का बसवले नाही, असा प्रश्न जनता विचारत आहे.

मागील विधानसभेच्या निवडणुकीपूर्वी आमदार प्रकाश दादा सोळुंके यांनी आपला राजकीय वारसदार पुतण्या





जयसिंह धैर्यशील सोळुंके हे असतील असे जाहीर केले आणि ऐन विधानसभा निवडणुकीत स्वतः उमेदवारी घेऊन निवडणूक लढवली. ज्यावेळी राजकीय वारसदार जाहीर केला त्यावेळी जयसिंह उमेदवार असतील असे सर्वांना वाटत होते, मात्र तसे झाले नाही आणि निवडणुकीत स्वतः उमेदवार म्हणून उभे राहिले. त्यानंतर लगेच ही माझी शेवटची निवडणूक आहे, असे जाहीर करून सहानुभूती मिळवली. दोन दिवसापूर्वी वडवणी मध्ये झालेल्या एका कार्यक्रमात आमदार प्रकाश सोळुंके यांनी पुन्हा तोच पाडा गिरवत, माझा राजकीय वारसदार पुतण्या ▶▶ पान २ वर

# पंकजा मुंडे यांनी मानले मुख्यमंत्र्यांचे आभार

मुंबई । प्रतिनिधी



फलटण येथील कर्तव्यावर असणाऱ्या वैद्यकीय अधिकारी व बीड जिल्ह्याच्या भूमिकन्या डॉ. संपदा मुंडे यांच्या मृत्यूप्रकरणी एसआयटी स्थापन करण्यात आली आहे. डॉ. संपदा मुंडे यांच्या मृत्यूप्रकरणी एसआयटी स्थापन करावी अशी मागणी सर्वप्रथम राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी केली होती. त्याच पद्धतीची जनभावनाही होती. या जनभावनेचा आदर करून मुख्यमंत्र्यांनी आज एसआयटीची स्थापना ▶▶ पान २ वर

# स्व.संपदा मुंडे प्रकरणात एसआयटी स्थापन

## न्याय मिळत नाही तोपर्यंत स्वस्थ बसायचे नाही–धनंजय मुंडे

मुंबई । प्रतिनिधी

सातारा जिल्ह्यातील फलटण येथे आरोग्य सेवेत कार्यरत असलेल्या व मूळच्या बीड जिल्ह्यातील वडवणी तालुक्यातील महिला डॉक्टर संपदा मुंडे यांच्या आत्महत्या प्रकरणात सखोल चौकशी करण्यासाठी एका वरिष्ठ आय पी एस दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या नेतृत्वात एस आय टी समिती स्थापन करून चौकशी करण्याचे निर्देश आज राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले असून, स्व. संपदा ताई या आपल्या बहिणीच्या न्यायासाठी उभारलेल्या लढ्याची ही पहिली पायरी असून हा लढा इतक्यावरच थांबणार नाही, असे मत माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांनी एक्स पोस्ट व्दारे व्यक्त केले आहे.



२३ ऑक्टोबर रोजी ऐन भाऊबीजेच्या रात्री डॉ. संपदा मुंडे यांनी आपल्या तळ हातावर सुसाईड नोट लिहून आत्महत्या केली होती. मात्र ही आत्महत्या संशयास्पद असल्याचे कुटुंबाने मत व्यक्त केल्यानंतर या प्रकरणाला वेगळे वळण ▶▶ पान २ वर

# बच्चू कडू, राजू शेट्टी यांच्याविरोधात गुन्हा दाखल

नागपूर । प्रतिनिधी

महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी सुरू झालेले तीव्र आंदोलन आता संपुष्टात आले असले तरी त्याचे राजकीय आणि कायदेशीर परिणाम उफाळून आले आहेत. आंदोलन संपल्यानंतर महाराष्ट्र सरकारने कठोर पावले उचलली आहेत. नागपूर जिल्ह्यातील हिंगणघाट पोलिस ठाण्यात बच्चू कडू, माजी खासदार राजू शेट्टी यांच्यासह सुमारे दोन हजार



आंदोलनकर्त्यांवर एफआयआर दाखल करण्यात आला आहे. आंदोलनकर्त्यांनी उच्च न्यायालयाच्या आदेशाची अवहेलना करून रस्ते रोखले आणि धरणे धरल्याचा आरोप या गुन्ह्यात नमूद करण्यात आला आहे.

कर्जमाफी, शेतमालाला हमी भाव आणि इतर मागण्यांसाठी विदर्भातून निघालेल्या शेतकऱ्यांनी अमरावती ते नागपूरपर्यंत ट्रॅक्टर मार्च काढला होता. या आंदोलनकर्त्यांनी नागपूर-हैदराबाद राष्ट्रीय महामार्ग (एनएच-४४) तसेच नागपूर-वर्धा महामार्ग पूर्णपणे जाम करून ▶▶ पान २ वर

# आता ६ वी, ८ वीच्या विद्यार्थ्यांना गिरवावे लागणार आयुर्वेदाचे धडे

## उच्च शिक्षणातही समावेशासाठी सरकारचा प्रयत्न

मुंबई । प्रतिनिधी

एनसीआरटीने आपल्या सहावीच्या आणि आठवीच्या विज्ञानाच्या पाठ्यपुस्तकात आयुर्वेदाचे धडे समाविष्ट केले आहेत. भारतीय विद्यार्थ्यांचा आरोग्य, पोषण आणि पर्यावरण याबाबत समतोल दृष्टीकोण निर्माण व्हावा यासाठी याचा समावेश करण्यात आला आहे. एनसीआरटीचे निर्देशक दिनेश प्रसाद सकलानी यांनी सांगितलं की, यामागे विद्यार्थ्यांना वैज्ञानिक ज्ञानाबरोबरच शारीरिक आणि मानसिक स्वास्थ याच्या व्याख्येची ओळख करून देणे हा उद्देश आहे.

सहावीच्या विज्ञानाच्या पाठ्यपुस्तकात विद्यार्थ्यांना आयुर्वेदाचे मूळ सिद्धांताची ओळख करून देण्यात येईल. तर आठवीच्या विज्ञानाच्या पाठ्यपुस्तकातून दिनचर्या, ऋतूनुसार जीवनशैली यासारख्या विषयांची माहिती देण्यात येणार आहे. ▶▶ पान २ वर

# मनोज जरांगे पाटील शिवाजीनगर न्यायालयात हजर

## फसवणूक प्रकरणात झाला युक्तीवाद

पुणे । प्रतिनिधी

नाट्यनिर्मात्याची फसवणूक केल्याप्रकरणी कोथरूड पोलिसांनी दाखल केलेल्या गुन्ह्यात सुरू असलेल्या दाव्यात मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील शुक्रवारी (दि. ३१) येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयात हजर राहिले. त्यांनी या गुन्ह्यातून दोषमुक्त करून प्रकरण निकाली काढावे, असा अर्ज केला आहे.

या अर्जावर बचाव पक्षाचा युक्तीवाद झाला. त्यानंतर उच्च,



सर्वोच्च न्यायालयाचे न्यायनिवाडे दाखल करण्यासाठी पुढील तारिख देण्यात आली आहे. १८ नोव्हेंबर रोजी पुढील सुनावणी होणार आहे. या प्रकरणात जरांगे पाटील यांच्या वतीने ॲड. हर्षद निंबाळकर, मूळ फिर्यादीच्या वतीने ॲड. खंडेराव टाचले, ॲड. आकाश बिराजदार आणि सरकारी पक्षातर्फे ॲड. डी.सी.खोपडे काम पाहत आहेत. नाटकांचे प्रयोग आयोजित करून त्याचे पैसे न दिल्याप्रकरणी जरांगे यांच्यासह अर्जुन प्रसाद जाधव आणि दत्ता बहीर (सर्व रा. अंबड, जालना) ▶▶ पान २ वर

# बच्चु भाऊ कडू निघालं ते उसाचं बेण!

बीड। सुभाष चौरे

ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी नवनवीन विकसित जातीचे उसाचे बेणे निर्माण होत आहेत मात्र या गोड उसाचे बेणे कडू निघाले तर ऊस गोड होणारच नाही. मोठ्या मेहनतीने कष्ट, मशागत करून वाया गेले असेच प्रहार संघटनेचे नेते शेतकऱ्याचे कैवारी बच्चू कडू यांनी उभारलेल्या शेतकरी कर्जमुक्तीच्या आंदोलनाचे झाले. सर्वच शेतकरी नेते एकत्र झाल्याने फलित गोड मिळेल अशी आशा होती परंतु सरकारने पुन्हा लॉलीपॉप हातात दिला आणि बच्चु भाऊ यांनी शेतकऱ्यांच्या आशा अपेक्षावर पाणी फिरून मागे हटले.

खाया पिया कुछ नही ग्लास तोडा....



अशीच काही स्थिती शेतकरी आंदोलनाची झाली. निवडणुकीपूर्वी जाहीरनाम्यामध्ये शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा मुद्दा होता अगदी तोच लावून धरत माजी आमदार बच्चू कडू यांनी नागपूरमध्ये मोठे शेतकरी आंदोलन उभे केले. यासाठी रविकांत तुपकर, शेट्टी, महादेव जानकर, पत्रकार आणि संपादक प्रकाश पोहरे आणि त्यासोबतच मनोज जरांगे पाटील देखील शेवटच्या टप्प्यात सामील झाले. बच्चू भाऊ शेतकऱ्यांसाठी लढत आहेत ही जाणीव राज्यातील शेतकऱ्यांना झाली होती. आता कर्जमाफी होईल हीच अपेक्षा बाळगून होते आणि आंदोलन त्याच दिशेने सुरू होते, मात्र अचानक या आंदोलनाने यु टर्न घेतला असेच म्हणावे लागेल. शासनाकडे गेलेल्या समितीला शासनाने मोठा लॉलीपॉप दिला तो म्हणजे ३० जून पर्यंत कर्जमाफी बाबत अंतिम निर्णय घेण्याचे आश्वासन दिले आणि शेतकऱ्यांसाठी सुरू असलेले हे आंदोलन लढवय्या बच्चू भाऊंनी कडू करून टाकले. आंदोलन स्थगित केल्यानंतर राज्यभर ज्या प्रतिक्रिया उमटत आहेत, त्या मात्र कडू ▶▶ पान २ वर

# ऊसतोड कामगारांना तात्काळ आर्थिक मदत द्या - निलम गोऱ्हे

मुंबई । प्रतिनिधी

विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी ऊसतोड कामगारांना तात्काळ आर्थिक मदत देण्याची मागणी करत ही मदत थेट डीबीटी प्रणालीद्वारे देण्यासाठी सहकार विभागाने प्रस्ताव सादर करावा, अशी सूचना केली. त्यांनी पुढे सांगितले की, ग्रामीण विकास विभागाने ऊसतोड कामगारांसाठी फिरत्या स्वच्छतागृहांच्या व्यवस्थेबाबत न्यायालयाच्या आदेशांची अंमलबजावणी करावी. त्यांच्या आरोग्यसेवेसाठी आठवड्यातून एकदा फिरता दवाखाना सुरू करावा आणि महिला कामगारांसाठी स्त्रीरोग तज्ज्ञांची सुविधा उपलब्ध करून द्यावी. तसेच, महिला ऊसतोड कामगारांना प्रसूती रजा आणि मातृत्व योजनेचा लाभ मिळावा, यासाठी आवश्यक ती पावले उचलावीत, ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.३१ ऑक्टोबर २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ७३.०० क्विंटल | २,२७१ | २,८७० | २,५५२ |
| ज्वारी/हायब्रिड : ७१.०० क्विंटल | २,०५० | ३,३०० | २,६४३ |
| मका/लोकल: ५०.०० क्विंटल | १,९५० | १,९५० | १,९५० |
| तूर : १९.०० क्विंटल | ३,८०१ | ७,००० | ५,७६७ |
| उडीद : १८.५० क्विंटल | ३,८५० | ५,२३६ | ४,७३० |
| बाजरी: ५५.०० क्विंटल | २,०४१ | ३,७१० | २,६०६ |
| मुग:४.५० क्विंटल | ४,९०० | ५,७०१ | ५,३०० |
| सोयाबीन: ३७७.५० क्विंटल | ३,९०० | ४,४५१ | ४,२९९ |
| हरभरा: १.०० क्विंटल | ४,९५१ | ४,९५१ | ४,९५१ |

cmyk

## अग्रलेख

# वेतन वाढते पण जबाबदारीचे काय?

केंद्रीय कर्मचाऱ्यांना आठव्या वेतन आयोगाची लॉटरी लागली आहे. आयोगाच्या शिफारशी अंमलात आल्यावर वेतनात किती टक्के वाढ होईल याची आकडेवारी माध्यमांत प्रसिद्ध झाली आहे. ती कदाचित खासगी कॉर्पोरेट क्षेत्रालादेखील मागे टाकणारी ठरू शकेल. सरकारी कर्मचारी आणि खासगी व कंत्राटी कर्मचारी यांच्या वेतनातील तफावत आता ठळकपणे वाढली आहे. सरकारी कर्मचारयांचे सध्याचे वेतन, इतर क्षेत्रातील कर्मचाऱ्यांनी तोंडात बोट घालावे असेच आहे. त्यात आता भरीव भर पडणार आहे.

एरवी सामान्य माणसांना सरकारी बाबूंच्या वेतनाशी फारसे देणेघेणे नाही, पण प्रश्न वेतनाबरोबरच येणाऱ्या उत्तरदायित्वाचा आणि यंत्रणेत खोलवर मुरलेल्या भ्रष्टाचाराचाही आहे. त्या पातळीवर लोकांचे अनुभव निराशाजनकच आढळतात. खासगी क्षेत्रातील कोणत्याही पातळीवरची वेतनवाढ त्या त्या पातळीवरच्या कर्मचाऱ्यांच्या कामगिरीशी, कार्यक्षमतेशी (परफॉर्मन्स) जोडलेली असते. कामगिरी जेवढी उच्च दर्जाची, तितकी वेतनवाढीची टक्केवारी आढळते, म्हणजे दिली जाते, असे निदान मानले तरी जाते. कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या बाबतीत तर तोही निकष लावला जात नसावा. आठव्या वेतन आयोगाच्या शिफारशींमुळे ही विषमता वाढत जाईल. वेतनातील हीच विषमता सरकारी नोकऱ्यांचे आकर्षण कमालीचे वाढवते. त्याचे प्रतिबिंब सरकारी नोकर भरतीत उमटते. जेव्हा जेव्हा भरती जाहीर होते तेव्हा तेव्हा जागांच्या तुलनेत कितीतरी पटींनी जास्त अर्ज दाखल होतात. उच्चविद्याविभूषित लोकदेखील कनिष्ठ पदांसाठी अर्ज करतात. कारण सरकारी नोकरी म्हणजे 'जिंदगी के साथ भी आणि जिंदगी के बाद भी' याची खात्रीच. 'पांचों उंगलीयां घी मे' असेच त्याचे वर्णन योग्य ठरू शकेल. शिवाय काम नाही केले किंवा पूर्ण नाही केले तरी वेतन किंवा वेतनवाढ रोखली जात नाही आणि नोकरीवरून काढलेदेखील जात नाही. इथे सामान्य माणसांचा सरकारी बाबूंशी थेट संबंध येतो. लोकांची सरकारी कामे वेळेत झाल्याची उदाहरणे बोटावर मोजण्या एवढीच. काही अधिकारी व कर्मचारी चौकटीबाहेरचा दृष्टिकोन अवलंबतात हे खरे आहे, बाकी सगळा आनंदच लोक अनुभवतात. कामाच्या मानसिकतेसंदर्भात महाराष्ट्रातील उदाहरण चपखल ठरू शकेल. अतिवृष्टीने शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. सरकारने मदत जाहीर केली. दिवाळीपूर्वी ती दिली जावी, असे सरकारचे आदेश होते. त्याला कात्रजचा घाट दाखवत काही जिल्हाधिकारी दिवाळीच्या सुट्टीवर निघून गेले होते. परिणामी, दिवाळीपूर्वी मदत दिली जाऊ शकली नाही. राज्याच्या कारभाऱ्यांनाही टाळण्याची हिंमत कशाच्या बळावर होते हे वेगळे सांगायला नको. खासगी कर्मचाऱ्यांच्या डोक्यावर कारवाईची तलवार असते तशी सरकारी कर्मचाऱ्यांच्या डोक्यावर कधीच आढळत नाही. बरे, घसघशीत सरकारी वेतन यंत्रणेत मुरलेला भ्रष्टाचार रोखते असाही लोकांचा अनुभव नाही. कारण काम अथवा भ्रष्टाचार याबाबतीत कडक कारवाई आढळत नाही. उदाहरणार्थ, सुट्टीवर गेलेल्या अधिकाऱ्यांची मुख्यमंत्र्यांनी खरडपट्टी काढल्याचे सांगितले जाते. त्याने काय होणार? खरडपट्टी वेतनवाढ रोखत नाही किंवा नोकरी गमावण्याची भीतीदेखील निर्माण करत नाही. म्हणजे त्याबाबतीत शेवटी ती बोलाचीच कढी ठरणार.

डॉ. कौशिक बसू हे माजी पंतप्रधान मनमोहन सिंगांचे आर्थिक सल्लागार होते. लाच घेणाऱ्याबरोबर लाच देणाऱ्या व्यक्तीलाही दोषी मानण्याची गरज नाही. त्यांनी केवळ लाचखोरीची तक्रार करणे पुरेसे ठरावे. म्हणजे लोक तक्रार करण्यास प्रवृत्त होऊ शकतील, असा सल्ला त्यांनी दिला होता. त्यातील मर्म लक्षात घेतले जाईल का? लोकांची किरकोळ कामेसुद्धा वेळेत होत नाहीत, अशी तक्रार लोक करतात. अनेक सरकारी खाती भ्रष्टाचारासाठी बदनाम असतात. हे का सरकारला माहीत नाही का? कोणताही बदल एकदम केला जात नाही असे तत्त्व सांगितले जाते. पण त्याची सुरुवात कधी ना कधी करावी लागते. पाऊल वाटेचाच पुढे हमरस्ता होतो हे विसरून कसे चालेल? तेव्हा सरकारी पातळीवरील जाणूनबुजून पोसल्या गेलेल्या अकार्यक्षमतेच्या मानसिकतेवर सरकार काय उपाय योजणार हा खरा प्रश्न आहे. वेतनवाढ देताना या उणिवा दूर करण्याचे उत्तरदायित्व सरकारचेच आहे.

# जिल्हा रुग्णालयतील कर्मचाऱ्यांनी गळफास घेऊन आत्महत्या

**जालना । प्रतिनिधी**

जालना जिल्हा रुग्णालय येथील कर्मचारी सतीश हिवाळे यांनी राहत्या शासकीय निवासस्थानी ठिकाणी गळफास घेऊन आत्महत्या केली सदरील घटना दि३१ ऑक्टोंबर रोजी संध्याकाळी पाच वाजेच्या दरम्यान घडली. सदरील घटनेची माहिती मिळताच नूतन वसाहत बिट अंमलदार तात्काळ सदर ठिकाणी



जाऊन घटनेची माहिती घेतली व पुढील कारवाई करण्यात आली. सतीश हिवाळे हा व्यक्ती वडिलांच्या जागेवर अनुकंपावर नोकरीला लागला होता अशी माहिती प्राप्त होत आहे. सदरील कर्मचारी सतीश हिवाळे हा जिल्हा सरकारी रुग्णालयातील प्रयोग शाळेत कार्यरत असलेल्या चतुर्थ श्रेणी कर्मचारी होता परंतु आत्महत्याच कारण अद्याप समजू शकले नाही.

# गंभीर हल्ला प्रकरणी आरोपीस जामीन मंजूर-ॲड.तेजस नेहरकर

बीड । प्रतिनिधी



घटनेची थोडक्यात हकीगत आशि की, मौजे हिवरापहाडी येथील फिर्यादीचे फिर्यादीवरून आरोपी अशोक शिवाजी शेळके रा. हिवरापहाडी ता. जि. बीड याच्याविरुद्ध फिर्यादीच्या डोक्यात लोखंडी रॉडने हल्ला करून जखमी केले तसेच जातीवाचक शिवीगाळ केली म्हणून गु.र. नंबर.२८८/२०२५. अन्वये पिंपळनेर पोलीस स्टेशन येथे कलम ११८,२, २१२., ११५,३५२,३५१, बी एन एस २०२३ प्रमाणे गंभीर हल्ला केला व जातीवाचक शिवीगाळ केली म्हणून ॲट्रॉसिटी कायद्यानुसार दिनांक.९/१०/२०२५ रोजी पिंपळनेर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करून आरोपीस अटक करण्यात आली होती व पीसी आर.घेण्यात आला होता त्यानंतर आरोपीचा जामीन अर्ज ॲड .तेजस एस नेहरकर यांच्यामार्फत मा. जिल्हा न्यायाधीश साहेब बीड यांच्या न्यायालयात दाखल करण्यात आला होता त्यावर सुनावणी होऊन आरोपीच्या वतीने मांडलेली बचावाची भक्कम बाजू व उत्कृष्ट युक्तिवाद याचा विचार करून माननीय न्यायालयाने आरोपीचा जामीन अर्ज.क्र.१०४८/२०२५ दिनांक २७/१०/२०२५ रोजी मंजूर केला आहे या प्रकरणाकडे पंचक्रोशीतील कार्यकर्त्यांचे लक्ष लागले होते. आरोपीच्या वतीने ॲड .तेजस नेहरकर व गौतम जी नाईकवाडे यांनी काम पाहिले.

# ढेकणमोहा गणातून अपक्ष लढवणार किरण डावकर यांची भूमिका

**बीड । प्रतिनिधी**

**नाळवंडी जिल्हा परिषद गट हा बीड तालुक्यातील महत्त्वाचा आणि लक्षवेधी गट मानला जातो. या गटात विविध पक्षांनी आपापले उमेदवार निश्चित करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. यंदाच्या निवडणुकीत जिल्हा परिषदेची जागा ओबीसी महिलांसाठी आणि पंचायत समितीची जागा ओपन पुरुषांसाठी राखीव आहे.**



स्थानिक पातळीवर अनेक नेते आणि कार्यकर्त्यांमध्ये राजकीय खेचाखेच सुरू असल्याने काही गावे विकासापासून वंचित राहिली आहेत. या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ता किरण डावकर यांनी पक्षांनी "सर्वसामान्य जनता आणि शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करून योग्य उमेदवार" दिला पाहिजे, अशी मागणी केली आहे. डावकर यांनी स्पष्ट इशारा देत सांगितले की, जर पक्षाने योग्य उमेदवार दिला नाही, तर मी स्वतः ढेकणमोहा पंचायत समिती गणातून अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक लढवेन. हे पाऊल मी गोरगरीब जनता आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी उचलणार आहे. त्यांनी पुढे सांगितले की, जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य देऊन, शेतकरी व सामान्य माणसांच्या विकासासाठी लढा देणं गरजेचं आहे, आणि यासाठीच ते अपक्ष उमेदवारीचा पर्याय खुले ठेवत आहेत.

पान ६ वरून...

### रन-वॉक फॉर युनिटी

राष्ट्रीय एकतेचा संदेश घेऊन पोलीस व नागरिक धावले/चालले. तसेच बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक, बस स्थानक, राजीव गांधी चौक या ठिकाणी पोलीस बॅन्ड चे प्रदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमात पोलीस अधीक्षक श्री.नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके व जिल्ह्यातील सर्व पोलीस स्टेशन अधिकारी व अंमलदार तसेच नागरिक सहभागी झाले होते.

--------------

### कर्जमाफी व शेतकऱ्यांच्या

यावेळी शेतकरी,कामगार नेते कॉ. ओम पुरी, विद्यार्थी नेते लहू खारगे, कॉ. भागवत झाटे, पप्पू आजबे ,शरद फरताडे ,बाबासाहेब व्हावळकर, रामप्रसाद कोल्हे, शरद फरतडे, यशवंत अनभूले ,रवींद्र जाधव, विकास मुंडे, सुंदरराव बादाडे, नागनाथ जगनाडे, गणेश गोंडे, भगवान गोंडे, विष्णू गवळी, गीज्ञानदेव राठोड, नामदेव राठोड, नानाभाऊ बादाडे यांच्या सह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

--------------

### धनवडे वस्ती लगत

नव्हे, तर सामाजिक आणि आध्यात्मिक उपक्रमांचे केंद्र बनावे, हा आमचा हेतू आहे. प्रत्येक नागरिकाचे थोडेसे योगदानही या महान कार्यात मोलाचे ठरणार असल्याने "दान देऊ इच्छिणाऱ्या नागरिकांनी आर्थिक किंवा वस्तुरूपी स्वरूपात मदत करण्याचे आवाहन साई मंडळ आष्टी यांच्यावतीने करण्यात आले आहे.यासाठी दान व अधिक माहितीसाठी ॲड. अभिजित गव्हाणे,मनोज धनवडे,चिंटू अग्रवाल,शुभम राऊत,संतोष रणसिंग,रितेश बोराडे,सुशील धनवडे यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

--------------

### बस स्थानक परिसरातुन

नेले बाबत शिवाजीनगर पोलीस ठाणे, बीड येथे गुन्हा दाखल झालेला होता. सदर गुन्हयाची तात्काळ गांर्भीयाने दखल घेवुन पोलीस निरीक्षक किशोर पवार यांनी गुन्हयातील अज्ञात आरोपीचा शोध घेणे कामी पथक तयार करुन रवाना केले होते. नमुद पथकातील अंमलदार यांनी सदर भागातील सी.सी.टि.व्ही.फुटेच चे आधारे तांत्रीक विश्लेषणाद्वारे आरोपीस निष्पन करुन त्यास चऱ्हाटा फाटा बीड परिसरातुन ताब्यात घेवुन त्याचे नाव पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव गणेश कचरु पवार वय ४८ वर्षे रा. बहिरवाडी ता.जि. बीड असे असल्याचे सांगीतले. त्यावेळी सदर आरोपीकडे विश्वासात घेवुन चौकशी केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली. त्यावेळी सदर आरोपीकडुन गुन्हयातील चोरीस गेलेली रोख रक्कम ६०,०००/- रु. जप्त केली आहे. सदर गुन्हयाचा अधिक तपास पोहवा/ ५६२ केंद्रे हे करत आहेत. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक नवनित काँवत , अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर , उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग बीड श्रीमती पुजा पवार यांचे मार्गदर्शनाखाली शिवाजीनगर पोलीस ठाणेचे पोलीस निरीक्षक किशोर पवार यांचे नेतृत्वात पोहवा/१६६४ रवि आघाव, पोहवा/५६२ केंद्रे, पोना/४७० ज्ञानेश्वर मराडे, पोशि/६१७ अशोक राडकर, पोशि/२०७७ बाळु रहाडे, पोशि/ ७६७ घटमाळ, पोशि/४८५ विलास कांदे व पोशि/९०४ लिंबाजी महानोर यांनी केली आहे.

--------------

### स्पोर्ट बाईकचा वापर

काळभोर ता. हवेली जि.पुणे हमु ईराणी गल्ली परळी ता. परळी जि.बीड असे सांगितले. त्यांची अंगझडती घेतली असता दोन्ही आरोपीच्या पॅन्टच्या खिशात प्लास्टीकच्या पिशवीत गुढाळलेली पोस्टे माजलगाव शहर गुन्ह्यातील चोरीस गेलेली (१) सोन्याची बोरमाळ वजन २४ ग्रॅम किमंत अंदाजे १,२५,०००/-रूपये, (२) पोस्टे परळी शहर गुन्ह्यातील चोरीस गेलेल्या गंठणचा तुकडा वजन अंदाजे ४.५ ग्रॅम किमंती ५०,०००/ -रूपये व गुन्हा करण्यासाठी वापरलेली (३) स्पोर्ट बाईक मोटर सायकल क्रमांक .०५ .०८२६ असा एकुन २,९५,०००/-रूपयाचा मुद्देमाल मिळुन आल्याने तो जप्त करून आरोपीस मुद्देमालासह पुढील कारवाई कामी पोस्टे परळी शहर यांच्या ताब्यात देण्यात आला आहे. स्थानिक गुन्हे शाखेचे पोउपनि सुशांत सुतळे, पोह १४६८ मारूती कांबळे, १४२९ रामचंद्र केकान, ९८९ विष्णु सानप, १९१८ गोविंद भताने, पोअ १०५५ सचिन आंधळे यांनी केली.

--------------

### शेतकऱ्याच्या चेहऱ्यावरचं हसू

नलावडे , श्रद्धा जोगदंड , निखिल राऊत , सहाय्यक कृषी अधिकारी सुनील बहिरवाळ, पांढऱ्याचीवाडी चे उद्योजक राजेभाऊ शेळके , तांदळ्याचीवाडी वाडीचे पोलीस पाटील अर्जुन तांदळे , धावज्याचीवाडीचे सरपंच महेंद्र काटकर , चाकरवाडी चे ग्रामस्थ चंद्रकांत डोईफोडे , बाबासाहेब पवार , अक्षय घोडके , अमर हजारे ,विकास पवार , चक्रधर भोसले, योगेश शेळके , धम्मदिप वंजारे , प्रकाश भोसले , रामा रंगा शेळके, दिनकर ताटे इत्यादी उपस्थित होते. समारोपाच्या वेळी तहसीलदार शेळके म्हणाले की आमचं खरं समाधान तेव्हाच आहे, जेव्हा शेतकऱ्याच्या चेहऱ्यावर पुन्हा हसू उमटेल. हेच आमचं ध्येय आहे. या संवाद उपक्रमामुळे शेतकऱ्यांमध्ये आत्मविश्वास वाढला असून, प्रशासनाशी थेट संवाद साधण्याची नवी दारे खुली झाली.

--------------

### यशराज पंडित, शिवराज

एकता दौड काढून एक भारत अखंड भारत ची घोषणा दिली. लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांची १५० वी जयंती दिनांक ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी गेवराई शहरात भारतीय जनता पार्टीच्या वतीने मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. गेवराई शहरातील भगवान नगर येथे असलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना पुष्पहार घालून, अभिवादन करून एकता दौड सुरू करण्यात आली. सदर एकता दौड रॅलीचा नगर परिषद समोर असलेल्या शास्त्री चौकातील लालबहादूर शास्त्री यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून समारोप करण्यात आला. भाजपा युवा नेते यशराज पंडित आणि भाजपा युवा नेते शिवराज पवार यांनी उपस्थित युवकांना, एक भारत अखंड भारत चे शिल्पकार सरदार वल्लभभाई पटेल यांचे कार्य आणि एकता दौडचे महत्त्व सांगितले. याप्रसंगी भाजपचे तालुकाध्यक्ष सचिन दाभाडे, ॲड उद्धव रासकर, प्रा पी टी चव्हाण, शिनूभाऊ बेदरे, शेख शहदाद, करण जाधव, दिनेश भंडारी यांच्यासह शहरातील भारतीय जनता पार्टीचे युवा पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

--------------

### तळेगाव मधील वेश्या

ग्राहकाने दिलेल्या नमूद वर्णनाच्या ५०० रू. दराच्या २ नोटा मिळून आल्याने त्या पंचासमक्ष जप्त केल्या. सदर ठिकाणी दोन पीडित महिला मिळून आल्या. पीडीत महिलांना विश्वासात घेवून चौकशी केली असता , त्यांनी सांगितले की, माया अरुण कांबळे आणि तिचा सहकारी सुरेश नवनाथ भोसले रा. महाकुंडे वसती तळेगाव ता. जि. बीड हे दोघे पीडीत महिलांना बाहेर जिल्ह्यातून बोलवून घेतात व स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी ग्राहकाकडून पैसे घेवून, पीडीत महिलांकडून वेश्या व्यवसाय करुन घेत असल्याचे सांगितले. आरोपी माया अरुण कांबळे हिची दोन पंचा समक्ष झडती घेतली असता, तिच्याकडे डमी ग्राहकाने दिलेल्या २ नोटा मिळून आल्या. तसेच रुमची झडती घेतली असता ३४ विना वापरलेले निरोध मिळून आले आहे. दोन्ही नमुद आरोपींवर पीडीत महिलांना स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी बोलावून घेऊन, स्वतःच्या ताब्यातील जागेचा वापर करुन त्याच कमाईवर उदरनिर्वाह करुन वेश्याव्यवसाय करण्यास लावले व सदर महिलांचे शोषण करण्याच्या उद्देशाने बोलावले म्हणून त्यांच्या विरुद्ध बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ कलम ३,४,५,६ व कलम ३(५) भा. न्या. संहिता प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे, तसेच दोन पीडित महिलांची सुटका करण्यात आली आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक उमाशंकर कस्तुरे प्रभारी पोलीस उपअधीक्षक मुख्यालय , पोलीस उप निरीक्षक पल्लवी जाधव , महीला पोलीस हवालदार उषा चौरे, शोभा जाधव, पोलीस हवालदार प्रदीप येवले, अशोक शिंदे, पोलीस शिपाई गजानन चौधरी , उर्मिला म्हस्के सर्व नेमणूक अ. मा. वा. प्र. कक्ष यांनी केली.

पान १ वरून...

### जूनपर्यंत होणाऱ्या शेतकरी आत्महत्यांची

पुन्हा एकदा सरकारने लोणकढी थाप मारून वेळ काढायचा प्रयत्न केला आहे. कर्जमाफीसाठी आक्रमक झालेल्या शेतकऱ्यांना जे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले आहे त्यातून पुढील प्रश्नांची उत्तरे मिळतील काय? शेतकऱ्यांची दैनावस्था समोर दिसत असताना तुमची परदेशी समिती नेमका कसला अभ्यास करून अहवाल देणार? पुढच्या वर्षी जूनमध्ये जर खरंच कर्जमाफी होणार असेल तर आत्ताच्या कर्जाचे हप्ते भरायचे का? पुढील वर्षी जुनच्या कर्जमाफीत हे हप्ते माफ होणार असतील तर ते का भरायचे? ते न भरता शेतकऱ्यांना रब्बीसाठी कर्ज मिळणार आहे का? जर नव्याने कर्ज मिळणार असेल तर ते देखील माफ होणार का? या प्रश्नांची उत्तरे कोण देणार? आणखी योग्य वेळ कोणती असू शकते? इतर मदत करण्याआधी खरडून गेलेली जमीन पूर्ववत करण्यासाठी शेतकरी माती मागतो आहे. पण त्याविषयी सरकार काहीच करायला तयार नाही. जगाचे पोट भरणारा शेतकरी आज भयंकर संकटात सापडला आहे. पाऊस अजूनही शेतकयांची पाठ सोडायला तयार नाही. सरकाराचे हजारो कोटींच्या नुकसानभरपाईची घोषणा केली; पण शेतकऱ्यांच्या खात्यावर किती पैसे जमा झाले हा प्रश्नच आहे. महाराष्ट्रात सहा महिन्यांपासून पाऊस पडतो आहे. शेतकरी पूर्णपणे उद्ध्वस्त झाला आहे. कर्जमुक्ती देण्याची यापेक्षा आणखी योग्य वेळ कोणती असू शकते? तरीही योग्य वेळ आल्यावर कर्जमुक्ती देऊ असे सांगून सरकारने जो वेळकाढूपणा चालवला आहे, ती शेतकऱ्यांची क्रूर चेष्टा आहे. मराठवाडा, विदर्भ व उत्तर महाराष्ट्रातून सातत्याने शेतकरी आत्महत्यांच्या बातम्या येत आहेत. आत्महत्यांचे हे वाढते आकडे सरकारच्या कानावर आदळत नाहीत काय? असे विविध प्रश्न उद्धव ठाकरे यांनी शासनाला विचारले आहेत.

---------

### वा प्रकाश दादा

जयसिंह असल्याचे जाहीर केले आणि अनेकांच्या लक्षात मागील घोषणा आली. हे तर यापूर्वी जाहीर केले होते मग आता पुन्हा जाहीर करण्याचे कारण काय तर आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणूक. विशेष म्हणजे जर राजकीय वारस पुतण्याला जाहीर केले होते तर लोकनेते सुंदरराव सोळुंके सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन पदी पुतण्या जयसिंह सोळुंके ऐवजी मुलगा वीरेंद्र सोळुंके यांना बसवले, ही बाब अनेकांना खटकली असेच म्हणावी लागेल. ग्रामीण भागामध्ये जयसिंह सोळुंके नेहमी संपर्कात असतात त्यामुळे त्यांच्या जनसंपर्काचा फायदा आपल्याला या निवडणुकीत होईल म्हणून प्रकाश दादांनी पुन्हा एकदा आपला राजकीय वारस जाहीर केला. परंतु लाभाचे पद आले की मुलगा, सून किंवा पत्नी यांनाच पदे दिले. घोषणा केवळ मते मिळवण्यासाठी असल्याचीही चर्चा मतदारसंघांमध्ये सुरू आहे. जर दादांनी खरोखरच जयसींग सोळुंके यांना आपला राजकीय वारसदार मनातून जाहीर केले असते तर साखर कारखान्याच्या चेअरमन पदी त्यांचीच निवड केली असती, परंतु तसे काहीही केले नाही. जनतेला संदेश देण्यासाठी व्हाईस चेअरमन म्हणून निवड केली गेली. आता पुन्हा एकदा जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नगरपालिकेच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवून वारसदाराची केलेली ही घोषणा कितपत सत्यात उतरते हे आता काळच ठरवेल.

-------------

### निवडणूक आयोगाच्या विरोधात

जोरदार तोफ डागली. हा मोर्चा दणदणीत झाला पाहिजे, असे सांगतानाच आपण स्वतः मोर्चासाठी लोकल मधून जाणार असल्याचे ठाकरे म्हणाले. मतदारयाद्या स्वच्छ केल्यानंतरच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घ्या, त्याला आणखी वर्ष लागले तरी हरकत नाही, असे ठाकरे यांनी म्हटले आहे. दरम्यान, मोर्चाला काँग्रेसकडून मोजक्याच नेत्यांची उपस्थिती राहणार असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. महाविकास आघाडी, मनसे आणि इतर विरोधी पक्षाच्या मोर्चाला काँग्रेसकडून बाळासाहेब थोरात आणि विजय वडेट्टीवार हे काँग्रेसचे राज्यातील प्रमुख नेते उपस्थित राहणार आहेत. तसेच प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनीही या मोर्चाला उपस्थित राहणार असल्याचे सांगितले आहे. मतचोरी, मतदार यादीतील घोळ, दुबार मतदार आणि निवडणुकांमधील गैरव्यवहाराच्या विरोधात विरोधक एकवटले आहेत. महाराष्ट्रातील महाविकास आघाडी आणि मनसे येत्या शनिवारी एकत्रितपणे, मुंबईत सत्याचा मोर्चा काढणार आहेत. त्याबाबत वाय बी चव्हाण सेंटर येथे बैठक पार पडली. महत्त्वाची बाब म्हणजे या बैठकीला राज आणि उद्धव ठाकरे उपस्थित होते.

--------

### बच्चू कडू , राजू शेट्टी

ठेवला, ज्यामुळे अनेक तास वाहतूक ठप्प झाली होती. हे आंदोलन विदर्भात मजबूत असलेल्या भाजपाला अडचणीत आणण्याच्या उद्देशाने उभे राहिले होते, असे मानले जात आहे. आंदोलनाचे नेतृत्व प्रहार जनशक्ती पार्टीचे प्रमुख आणि माजी आमदार बच्चू कडू यांनी केले होते. त्यांच्यासह राजू शेट्टी यांच्यावर विविध कलमांखाली (जसे की सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान, वाहतूक अडवणे आणि न्यायालय अवमान) हे गुन्हे दाखल झाले आहेत. बच्चू कडू यांनी आंदोलन संपल्याची घोषणा केल्यानंतरही सरकारने ही कारवाई केल्याने शेतकऱ्यांमध्ये प्रचंड नाराजी पसरली आहे. बच्चू कडू यांनी प्रतिक्रिया देताना म्हटले आहे की, शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी आवाज उठवल्यामुळेच त्यांच्यावर एफआयआर दाखल करण्यात आला आहे. आंदोलनादरम्यान त्यांनी शेतकऱ्यांना शांतता राखण्याचे आणि हिंसा टाळण्याचे आवाहन केले होते. उच्च न्यायालयाने रस्ते तात्काळ रिकामे करण्याचे आदेश दिल्यानंतर सरकारने शेतकरी नेत्यांशी चर्चा करून कर्जमाफीवर सकारात्मक आश्वासन दिले. त्यानुसार, आंदोलन मागे घेण्याशिवाय पर्याय राहिला नव्हता. आंदोलनाला विदर्भातील शेतकऱ्यांकडून प्रचंड प्रतिसाद मिळाला होता.

-----------

### स्व.संपदा मुंडे प्रकरणात

लागले होते. दरम्यान माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांनी मयत डॉ. संपदा यांच्या कुटुंबियांची वडवणी तालुक्यातील कौडगाव येथे सांत्वन पर भेट घेतल्यानंतर कुटुंबीयांनी डॉ संपदा यांच्या मृत्यू बाबत अनेक संशय व्यक्त केले होते. संपदा ताई यांनी वैद्यकीय सेवे दरम्यान आपल्यावर वेगवेगळ्या प्रकरणात दबाव आणत नाना प्रकारे त्रास दिला व शारीरिक, मानसिक छळ केल्याचे स्वतः अनेकदा विविध तक्रारींच्या माध्यमातून शासन प्रशासनास लेखी कळवले होते. मात्र त्याची दखल न घेत लैंगिक, शारीरिक व मानसिक छळ केला तसेच त्यांची आत्महत्या देखील संशयास्पद परिस्थितीत झाली. त्यामुळे मृत्यू आधी व नंतरच्या अनेक घडामोडी संशयास्पद होत्या, असे मत धनंजय मुंडे यांनी व्यक्त केले होते. दरम्यान या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्यासाठी एका वरिष्ठ महिला आय पी एस अधिकाऱ्यांच्या नेतृत्वात स्वतंत्र एस आय टी समिती स्थापन करावी, त्यात सातारा जिल्ह्यात कार्यरत अधिकारी - कर्मचारी नेमण्यात येऊ नयेत व वस्तुनिष्ठ चौकशी केली जावी आणि संपदाच्या मृत्यूस कारणीभूत असलेल्या प्रत्येकाला कठोर शिक्षा व्हावी, अशी अपेक्षा मुंडेंनी राज्याच्या मुख्यमंत्री महोदयांकडे व्यक्त केली होती. दरम्यान या प्रकरणात स्व. डॉ. संपदा यांच्या कुटुंबीयांसह अनेक सामाजिक व राजकीय पक्षांच्या नेत्यांनी आवाज उठवला असून आज मागणी प्रमाणे एस आय टी समिती स्थापन करण्यात येत असल्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गृह विभागास दिले आहेत. स्व. संपदा मुंडे यांच्या न्यायाच्या लढाईत हे पहिले पाऊल असून, डॉ. संपदा या आपल्या बहिणीस छळलेल्या प्रत्येक गुन्हेगारास गजाआड करेपर्यंत मी किंवा या लढ्यातील कुणीही शांत व स्वस्थ बसणार नाही, असे मत धनंजय मुंडे आपल्या एक्स पोस्ट व्दारे व्यक्त केले आहे.

---------

### पंकजा मुंडे यांनी मानले

केली आहे. त्याबद्दल पंकजाताई मुंडे यांनी मुख्यमंत्री यांचे आभार व्यक्त केले आहेत. डॉ. संपदा मुंडे यांच्या मृत्यू प्रकरणाचा तपास आता वरिष्ठ महिला पोलीस अधिकाऱ्याच्या नेतृत्वाखालील एसआयटी करणार असुन एसआयटी चौकशीतून निश्चितच डॉ. संपदा मुंडे यांना न्याय मिळणार आहे. जनभावनेचा सरकारने आदर केला आहे. याचा आपल्याला विश्वास होता असे नमूद करून याबद्दल ना. पंकजाताई मुंडे यांनी मुख्यमंत्र्यांचे आभार व्यक्त केले आहेत. कवडगाव येथे सगळ्यात अगोदर जाऊन पंकजाताई मुंडे यांनी डॉ. संपदा यांच्या आईवडिलांची व परिवाराची भेट घेऊन सांत्वन केले होते.

--------------

### मनोज जरांगे पाटील शिवाजीनगर

यांच्याविरोधात फसवणूक व अपहार केल्याप्रकरणी कोथरूड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. याबाबत धनंजय घोरपडे (रा. वारजे) यांनी फिर्याद दिली होती. या प्रकरणी दोषमुक्त करण्यासाठी जरांगे पाटील यांनी अर्ज केला आहे. मात्र, आजारपणामुळे मागील काही तारखांना जरांगे पाटील उपस्थित नव्हते. त्यानंतर न्यायालयाच्या आदेशाने ते उपस्थित राहिले. त्यावेळी त्यांच्या वतीने ॲड. हर्षद निंबाळकर, ॲड. शिवम निंबाळकर यांनी काम पाहिले. या गुन्ह्यात जरांगे-पाटील यांच्या विरोधात कोणतेही ठोस पुरावे उपलब्ध नाहीत. फसवणूक करण्याचा त्यांचा कोणताही उद्देश नव्हता. बुक करण्यापूर्वीच आगाऊ ५ लाख रुपये देण्यात आले आहेत. तसेच, नाटकाबाबत झालेल्या करारावर त्यांनी सह्या केलेल्या नाहीत. आरोप निश्चिती करण्यास पुरेसे असे पुरावे नाहीत. त्यामुळे त्यांना गुन्ह्यातून वगळावे, असा युक्तीवाद ॲड. निंबाळकर यांनी केला. पुढील तारखेस निंबाळकर यांचा आणखी युक्तीवाद होणार आहे. त्यानंतर सरकारी वकील ॲड. डी.सी.खोपडे आणि मूळ फिर्यादीच वतीने ॲड. खंडेराव टाचले, ॲड. आकाश बिराजदार यांचा युक्तीवाद होणार आहे.

----------

### आता ६ वी, ८ वीच्या विद्यार्थ्यांना

या बदलामुळे विज्ञानाच्या पुस्तकाला फक्त नव रूप येणार नाही तर विद्यार्थ्यांना भारतीय पारंपरिक वैज्ञानिक माहिती आणि आयुर्वेदाची समज वाढवण्यासाठी देखील मदत होणार आहे. सरकारच्या म्हणण्यानुसार आयुर्वेदाचा समावेश शालेय पाठ्यपुस्तकात केल्यानंतर आता उच्च शिक्षणात देखील याचा समावेश करण्याच्या दृष्टीनें काम सुरू आहे. एनसीआरटीच्या नव्या विज्ञानाच्या पुस्तकात आयुर्वेदाच्या वैज्ञानिक सिंद्धांताची भाषा सोपी ठेवण्यात आली आहे. युजीसी आणि आयुष मंत्रालय कॉलेज आणि विद्यापीठातील पाठ्यपुस्तकात आयुर्वेदाचा समावेश करण्यासाठी एक मॉड्युल तयार करत आहेत. आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांनी ॲलोपॅथी आणि आयुर्वेदिक पद्धती या एकमेकांना पुरक आहेत. याद्वारे एकीकृत आरोग्य सेवा मॉडेल विकसीत करण्याचा उद्येश आहे. यामुळं कॉलेज स्तरावर आयुर्वेदाचा विस्तार हा विद्यार्थ्यांना पारंपरिक ज्ञानाशी जोडणे आणि आयुर्वेदाला जागतिक मान्यता देण्यासाठी केंद्राच्या प्रयत्नांना मदत होईल.

**विद्यार्थ्यांना देणार मुलभूत धडे**

सहावीच्या पाठ्यपुस्तकात आयुर्वेदाचे २० विरोधी गुणांच्या बाबतीत माहिती देण्यात आली आहे. याद्वारे विद्यार्थ्यांना संपूर्ण आरोग्याच्या मुलभूत गोष्टींची समज निर्माण होईल. आठवीच्या विद्यार्थांना आयुर्वेदाच्या माध्यमातून शरीर, मन आणि पर्यावरण यांचे संतुलन याबाबत माहिती मिळणार आहे. त्यात दैनंदिन आरोग्याच्या सवयी, कोणत्या ऋतूत काय खाल्ले पाहिजे हे शकवण्यावर भर दिला जाईल.

--------------

### ऊसतोड कामगारांना तात्काळ

अशी मागणीही डॉ. गोऱ्हे यांनी केली. ऊसतोड कामगारांच्या आरोग्य व सामाजिक संरक्षणासाठी शासनाने ठोस धोरण आखावे, असेही त्यांनी स्पष्ट केले. ऊसतोड कामगारांच्या अडचणी आणि त्यांच्या हिताच्या उपाययोजनांवर चर्चा करण्यासाठी विधानभवनात बैठक झाली. या बैठकीत त्या बोलत होत्या.

------------

### बच्चु भाऊ कडू निघालं ते

मॅनेज झाले अशाच आहेत. प्रामुख्याने या आंदोलनामध्ये काही राजकीय शक्ती देखील असल्याचा संशय व्यक्त केला जात होता. ज्याप्रमाणे मनोज जरांगे पाटील अंतरवलीमध्ये आंदोलनाला बसले होते त्यावेळी वारंवार तात्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे सदस्य म्हणून बच्चू कडू भेटत होते आणि आता त्यांनी सुरू केलेल्या आंदोलनाला शिंदे यांचाही अंधारातून पाठिंबा असल्याचे बोलले जात होते. या सोबतच दुसरे राजकीय पाठबळ म्हणजे खासदार शरद पवार यांचे असल्याचेही बोलले जाते. त्याचे कारण म्हणजे राज्यातील शेतकऱ्यांचा रोष सरकारविरुद्ध कायम राहावा आणि त्याचा फायदा व्हावा हा त्यामागचा उद्देश असल्याचे बोलले जाते. परंतु बच्चू कडू यांनी सरकार विषयीची जी भूमिका ठामपणे घेतली होती ती शेवटपर्यंत राहिली नाही, त्यामुळे पुन्हा एकदा शेतकऱ्यांना फाशीला लावून बाजूला केल्याचे दिसत आहे. जर आंदोलन स्थगित केले नसते तर काहीतरी निर्णय घ्यावाच लागला असता, परंतु जून २०२६ पर्यंतचे आश्वासन दिले गेले. आश्वासन म्हणजे ते पूर्ततेसाठी नसते याची खात्री जनतेला पटली आहे. या आंदोलनामधून काहीतरी गोड संदेश मिळेल, अशी अपेक्षा होती मात्र पेरलेले बीज खराब निघाल्याने शेतकऱ्यांना डोक्यावर हात मारून घ्यायची वेळ आली असेच म्हणावे लागेल. कारण भविष्यामध्ये पुन्हा शेतकऱ्यासाठी आंदोलन उभा केले तर शेतकरी विश्वास ठेवतील असे काहीच नाही.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शनिवार दि. १ नोव्हेंबर २०२५ ३

## थोडक्यात...



### राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय एकता दिनानिमित्ताने सरदार वल्लभभाई पटेल यांना अभिवादन


किल्ले धारूर । प्रतिनिधी

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये दि. ३१ ऑक्टोंबर २०२५ रोजी प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांच्या हस्ते राष्ट्रीय एकता दिनानिमित्ताने सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी राष्ट्रीय छात्र सेनेच्या कॅडेट्सनी राष्ट्रीय एकता दौड काढली. तसेच यानिमित्त धारूर शहरातील माजी सैनिक श्री. माधव गवरकर यांनी राष्ट्रीय छात्र सेनेच्या कॅडेट्सना राष्ट्रीय एकता दौड निमित्त मार्गदर्शन केले. यावेळी मेजर डॉ. मिलिंद गायकवाड यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले व आभार मानले. कार्यक्रमावेळी कार्यालय अधीक्षक सुभाष वायाळ, प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थ्यांची उपस्थिती मोठ्या संख्येने होती.

### पडझडीच्या अनुदानाबाबत तालुका पत्रकार संघाच्या वतीने कोल्हे यांच्याकडून आढावा

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुका पत्रकार संघ च्या वतीने पडझड व पुराचे पाणी घरात शिरलेले अनुदान कधीपर्यंत वाटप होणार याची विचारणा करण्यात आली पत्रकार संघाचे अध्यक्ष सोमीनाथ जी कोल्हे साहेब यांनी तहसीलदार यांच्याकडून आढावा घेतला



पाटोदा शहर व तालुक्यातील शेतकऱ्यांच्या घरांच्या पडझडी वाहून गेलेली शेती पोराचे पाणी शिरलेले घरात खरडून गेलेली शेती या संदर्भात तहसीलदार यांच्याशी अनुदानाबाबत विचारणा करण्यात आली व आढावा घेऊन राहिलेले पंचनामे कधी करणार लोकांच्या अनुदान कधीपर्यंत टाकणार अशी विचारणा करण्यात आली तहसीलदार यांच्याकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला. व उपस्थित. राहुल सोनवणे. पत्रकार सय्यद रियाज. पत्रकार . पत्रकार महेश जी बेंद्रे. डॉक्टर नरेंद्र जावळे. पत्रकार सचिन. सतीश गरजे पत्रकार. गायकवाड. मैशेर शेख.इत्यादी उपस्थित होते.

### नागापूर ते कपिलधार पदयात्रेचे परचुंडी येथे स्वागत

परळी । प्रतिनिधी

नागापूर ते कपिलधार पदयात्रा वर्ष ४९ वे असून ही पदयात्रा ष.ब्र.१०८ शंभूलिंग शिवाचार्य महाराज अंबाजोगाईकर यांच्या नेतृत्वाखाली आज परचुंडी येथे आली असता परचुंडी ग्रामस्थांकडून भव्य स्वागत



करण्यात आली. यावेळी चहा,नाष्टा व बिसलेरी पाण्याची व्यवस्था श्री अर्जुन लक्ष्मनआप्पा नावंदे व आदर्श शिक्षक अशोक नावंदे यांच्यासह वीरशैव समाज परचुंडी यांच्या कडून करण्यात आली. श्री वैजनाथ पत्रवाळे यांच्याकडून श्रीगुरुचे पादपूजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी लक्ष्मण नावंदे,गुरुलिंग नावंदे,वसंत नावंदे,देवराव पत्रवाळे,हनुमंत नावंदे,गणपत नावंदे, जनार्धन नावंदे सर,सुभाष नावंदे,अभिजित नावंदे,माणिकआप्पा नावंदे,मंगेश नावंदे,विशाल नावंदे,राजाभाऊ नावंदे,कुंडलिक पत्रावाळे, वशिष्ठ महाराज रुपनर, नानासाहेब रुपनर ,वीरभद्र नावंदे यांनी परिश्रम घेतले.

# रस्त्यांची दुर्दशा आणि अंबाजोगाईकरांचा संताप

## शासनाचे करोडो रूपये 'खड्ड्यात' अंबाजोगाईत साजरी झाली खड्ड्यांची दिवाळी!

अंबाजोगाई । प्रतिनिधी

दिवाळीच्या दिवशी अंबाजोगाईत दिव्यांनी सजलेले रस्ते हा नेहमीचा अनुभव. मात्र अंबाजोगाईत यंदा दिवे रस्त्यांवर नव्हे तर रस्त्यांच्या खड्ड्यांत पेटले. शहरातील सतत वाढणारे खड्डे, पावसात उखडलेले सिमेंट रस्ते आणि प्रशासनाचे मौन पाहून संतप्त नागरिकांनी दिवे, मेणबत्त्या, रांगोळ्या आणि पुष्पहारांनी खड्ड्यांची पूजा करत अनोखा निषेध नोंदवला. मोठा गाजावाजा आणि अंबाजोगाईतील रस्त्यांसाठी हजारो कोटींचा निधी खर्च झाला हे किती पोकळ व दिखाऊ आहे याचा प्रत्यय आल्याचे संतप्त नागरिकांनी बोलून दाखवले.

अंबाजोगाई शहरात नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या परिक्षेत्रात अधिसुचित विशिष्ट नागरी सेवा, सुविधा पुरविणे योजनेअंतर्गत कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई यांनी काही महिन्यांपूर्वीच तयार केलेल्या रस्त्यांवर मोठं-मोठ्या खड्ड्यांमुळे या नवीन रस्त्यांची अवस्था अक्षरशः दयनीय झाली आहे. त्यामुळे अंबाजोगाई शहरातील नागरिकांना या रस्त्यांवरून धोकादायक प्रवास करावा लागत आहे. खड्ड्यांमुळे अपघाताच्या घटना ही समोर येत आहेत. गणेशोत्सव, दसरा, नवरात्री उत्सव आणि नुकतीच दिवाळी ही झाली. पण, अंबाजोगाई शहरातील रस्त्यांची दैना काही फिटली नाही. शहरातील विविध मार्गावरील दिवसेंदिवस वाढणाऱ्या खड्ड्यांमुळे वाहनधारकांचे मोठे हाल होत आहेत. प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी स्थानिक नागरिकांनी दिवाळी पाडव्यानिमित्त या खराब रस्त्यांवर अनोख्या पद्धतीने निषेध व्यक्त केला. जागोजागी पडलेल्या खड्ड्यांमध्ये पणत्या, दिवे, मेणबत्त्या लावून, फटाके वाजवून आणि काही ठिकाणी तर रांगोळी काढून रस्त्यांची दिवाळी साजरी करीत झोपलेल्या प्रशासनाला जागे करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. या आंदोलनाला स्थानिक ज्येष्ठ नागरिक, युवक, महिला भगिनी यांचाही मोठा प्रतिसाद मिळाला. नागरिकांनी अंबाजोगाईतील रस्त्यांसाठी हजारो कोटींचा निधी आणला असा दावा करणाऱ्यांचा, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि संबंधित गुत्तेदार यांचा अनोख्या पद्धतीने निषेधच व्यक्त केला. अंबाजोगाई शहरातून जाणाऱ्या सिमेंट रस्त्यांवर तब्बल ४०० ते ५०० हून अधिक खड्डे पडले आहेत. काही ठिकाणी मोठ-मोठ्या भेगा तर अर्धा फुटांचे ही खड्डे रस्त्यावर पडले आहेत. त्यात पाणी साचल्याने खड्ड्यांच्या खोलीचा अंदाजही येत नाही. अनेक ठिकाणी रस्ते दुभंगले आहेत. तर खडी उघडी पडली आहे. त्यामुळे अनेकदा दुचाकी वाहनधारक घसरून पडत आहेत. अंबाजोगाईकरांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागतो. दुर्दैवाने काही मोठी दुर्घटना घडली तर त्याची जबाबदारी कोण घेणार? असा संतप्त सवाल नागरिकांकडून केला जात आहे. ''खड्डे बुजविण्याऐवजी आता आम्हालाच त्यांची पूजा करावी लागते यापेक्षा दुर्दैव ते काय ? आम्ही कर रूपाने शासनाच्या तिजोरीत जमा केलेले कष्टाचे पैसे असे खड्ड्यात जात आहेत. याचे वाईट वाटते. तर विकास कामांचे श्रेय घेणाऱ्यांनी अशा निकृष्ट दर्जाच्या कामांची जबाबदारी ही आता जाहीरपणे स्विकारावी असा टोला सुज्ञ नागरिक संबंधितांना लगावत आहेत. दरम्यान, अंबाजोगाईकरांनी प्रशासनास तातडीने रस्ता दुरूस्त करण्याचे आवाहन केले आहे.





### एकाच गुतेदाराकडे सर्व कामे, पार्टनरशिपचे गौडबंगाल ?

अंबाजोगाई शहरात रस्ता व नाल्या तयार करण्याचे, पाणी पुरवठा वितरण वाहिन्या अंथरणे, वीज वितरण पोल बसविणे, देखभाल दुरूस्ती करणे, रस्त्याच्या दुतर्फा वृक्षारोपण, शासकीय इमारत बांधकाम, उद्यान सुशोभीकरण ही सर्व कामे एकाच एजन्सीला देण्यामागे नेमके काय गौडबंगाल आहे. कारण, शासनाचे कोणतेही काम असो नेहमीचा एकच गुत्तेदार ठरलेला आहे. त्यामुळे या सर्व कामांमध्ये गुत्तेदारासोबत कोणाची ''पार्टनरशीप'' आहे. हे अंबाजोगाईतील सर्व जनतेला माहित झाले आहे. सत्ताधारी पक्षाच्या आमदारांच्या मर्जीतील याच गुत्तेदाराने त्याला वाट्टेल तसे, वाट्टेल तिथे, नागरिकांची मागणी असो किंवा नसो, निराश्रथ कामे करून ठेवल्याचा आरोप माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी केला आहे.

### निकृष्ट दर्जाच्या कामांची पालकमंत्र्यांकडे तक्रार करणार

''रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे होणाऱ्या त्रासावर आणि अपघातांवर निषेध व्यक्त करण्यासाठी अंबाजोगाईकरांनी दिवाळीच्या निमित्ताने या खड्ड्यांमध्ये दिवे लावून, रांगोळ्या काढून खड्ड्यांची दिवाळी साजरी केली. प्रशासनाचे लक्ष या गंभीर समस्येकडे वेधून रस्त्यांवरील खड्डे बुजविण्यासाठी आणि दुरूस्तीसाठी कृती करण्यास भाग पाडणे यासाठीहे आंदोलन होते. मात्र याची सार्वजनिक बांधकाम विभाग व संबंधित प्रशासनाने कोणतीही दखल घेतली नसल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. याप्रकरणी लवकरच आपण राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार साहेब यांच्याकडे अंबाजोगाईतील निकृष्ट दर्जाच्या रस्ता व नाली बांधकामांची पालकमंत्र्यांकडे रितसर तक्रार करणार आहे.''

राजकिशोर मोदी, माजी नगराध्यक्ष अंबाजोगाई

## दिंद्रुड पोलिस ठाण्यातर्फे राष्ट्रीय एकता दिन साजरा

दिंद्रुड । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथे पोलीस स्टेशनच्या वतीने, लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय एकता दिन साजरा करण्यात आला या निमित्ताने शुक्रवारी (दि. ३१ रोजी) पाच किलोमीटरची ''एकता दौड'' मॅरेथॉन आयोजित करण्यात आली.याप्रसंगी तरूणांनी उत्साहात सहभाग घेतला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित दिंद्रुड पोलीस अधिकारी, कर्मचारी, पत्रकार व नागरिकांनी राष्ट्रीय एकतेची शपथ घेतली. सहाय्यक पोलीस निरीक्षक महादेव ढाकणे यांच्या नेतृत्वाखाली हिरवा झेंडा दाखवून मॅरेथॉनचा प्रारंभ झाला. यावेळी १०० ते १२० तरूणांनी उत्साहाने सहभाग घेतला. मॅरेथॉन शांततेत व शिस्तबद्ध वातावरणात पार पडली. सर्व सहभागींना दिंद्रुड पत्रकार संघाच्या वतीने अध्यक्ष अमोल ठोंबरे यांच्या प्रयोजनात व मार्गदर्शक संतोष स्वामी याच्या वतीने प्रशस्तिपत्रक प्रदान करण्यात आले.मॅरेथॉन नंतर फळांचे वाटप पोलीसांनी केले.या उपक्रमास संकल्प अकॅडमीचे प्रशिक्षक माधव केंद्रे, संदीप तिडके, प्रा. बाबुराव गित्ते, गणेश होरमाळे, विजय आडे, पत्रकार संतोष स्वामी, नवनाथ कांबळे यांच्यासह नागरिकांचा भरभरून प्रतिसाद मिळाला. या कार्यक्रमाचा समारोप परिसर स्वच्छ करत करण्यात आला. उपस्थितांचे आभार पोलीस उपनिरीक्षक सलमान शेख यांनी मानले.




बीड : डॉक्टर संपदा मुंडे यांच्या हत्या प्रकरणात शासनाने एसआयटी स्थापन करून खरे आरोपी शोधून दोषारोप पत्र दाखल करावे व जलद गतीने खटला चालवावां यासाठी बीड जिल्हा वकील संघाच्या वतीने निवेदन देण्यात आले.

## वल्लभभाई पटेल हे भारताच्या एकतेचे शिल्पकार-प्राचार्य डॉ.तात्याराम सोंडगे

गेवराई । प्रतिनिधी

भारतीय स्वातंत्र्य प्राप्तीनंतर ५६५ संस्थानिकांचा प्रश्न सोडवून खऱ्या अर्थानं भारताचे राजकीय एकीकरण करणारे सरदार वल्लभभाई पटेल हे भारताच्या एकतेचे शिल्पकार आहेत. असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. तात्याराम सोंडगे यांनी केले. ते महिला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे आयोजित वल्लभभाई पटेल जयंती व माजी पंतप्रधान इंदिरा गांधी पुण्यतिथी निमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते.



भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही देशांमध्ये ५६५ संस्थानं होती. विलीनीकरणाबाबद इंग्रजांनी

संस्थानिकांना स्वातंत्र्य दिल्यामुळे भारताचे स्वातंत्र्य व अखंडता धोक्यात येऊ शकत होती. हे ओळखून तत्कालीन गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी मोठ्या कौशल्याने संस्थानिकांचे मनसुबे उधळून लावून त्यांना भारतात विलिनीकरण करायला भाग पाडले. त्यामुळेच सरदार वल्लभभाई पटेल हे भारताच्या एकतेचे शिल्पकार आहेत. तसेच माजी पंतप्रधान स्वर्गीय इंदिरा गांधी या कर्तृत्ववान पंतप्रधान होत्या. त्यांनी भारत-पाकिस्तान युद्धात कणखर भूमिका घेऊन विजय मिळवून दिला. तसेच आंतरराष्ट्रीय दबावाला बळी न पडता पाकिस्तान चे विभाजन करुन बांग्लादेशाची निर्मिती केली. असे प्रतिपादन त्यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. राजाभाऊ चव्हाण यांनी केले. प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. शिवाजी दिवाण यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. डॉ. दत्ता तंगलवाड यांनी केले. यावेळी प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची उपस्थिती होती.

## स्व.प्रवीण जाधव कुटूंबियाचे सांत्वन व चंद्रकांत नवले यांचे कडून आर्थिक मदत

बीड । प्रतिनिधी

केकत पांगरी तांडा (ता. गेवराई, जि. बीड) येथे बंजारा समाजाला .. आरक्षण न मिळाल्यामुळे समाजातील अत्यंत विश्वासू युवक प्रविण भाऊ जाधव यांनी आत्महत्या केली.या दु:खद प्रसंगी त्यांच्या कुटुंबाला भेट देऊन शिवसेना जिल्हाप्रमुख चंद्रकांत नवले यांनी आर्थिक मदत सुपूर्द केली आणि कुटुंबाला सांत्वन दिले.



या कुटुंबाच्या पाठीशी महाराष्ट्राचे लाडके उपमुख्यमंत्री नामदार एकनाथरावजी शिंदे साहेब, डॉ. खासदार श्रीकांत शिंदे साहेब, तसेच बीड जिल्हा शिवसेना ठामपणे उभी राहील.कार्यक्रमावेळी मा. आमदार हरिभाऊ राठोड, बाबुराव जाधव, रवि राठोड, भारत राठोड, एकनाथ आडे, राजू राठोड, साहेबराव राठोड, मुकेशआण्णा महाजन, प्रकाश नरनाळे, उद्धवजी मडके, शिवराज उगले, दत्तात्रय येवले, नागेश मिटे पाटिल, अभय भांडवलकर, विक्रम भोसले, सतीश राठोड, नवनाथ गवते आणि अखंड बंजारा समाजाचे बांधव उपस्थित होते.सर्वांनी मिळून दिवंगत प्रविण भाऊ जाधव यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

## प्रदीप नारायणकरने पुण्यात केले स्वत:चे विश्व निर्माण

### आ.सुरेश धस यांनी भेट देऊन केले कौतुक

पाटोदा । प्रतिनिधी

आष्टी-पाटोदा-शिरूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुरेश धस यांनी दिनांक २७/१०/२०२५ मंगळवारी रोजी विमान नगर पुणे येथे पाटोदा शहरातील सुपुत्र प्रदीप हनुमंत नारायणकर यांनी स्थापन केलेल्या 'पीएचएन टेक्नॉलॉजी प्रा.लि.'या कंपनीस भेट दिली.पाटोदा सारख्या ग्रामीण भागातील तरुणाने पुण्यासारख्या शहरात स्वतःची कंपनी उभारून तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात आंतरराष्ट्रीय स्तरावर नाव कमावणे ही अभिमानास्पद बाब असल्याचे गौरवोद्वार आमदार सुरेश धस यांनी यावेळी काढले.



या भेटीदरम्यान आ.सुरेश धस यांनी कंपनीकडून रोबोट तंत्रज्ञान,कृत्रिम बुद्धिमत्ता आणि अत्याधुनिक संगणकीय प्रणाली या क्षेत्रातील सुरू असलेल्या संशोधन आणि निर्मिती प्रक्रियेची सविस्तर माहिती घेतली.कंपनीचे कार्य पाहून त्यांनी समाधान व्यक्त करत सांगितले की,पाटोदा या भूमीतील सुपुत्र प्रदीप नारायणकर यांनी केवळ आपल्या मेहनतीने आणि कल्पकतेने हे

यश संपादन केले आहे. पाटोद्याची माती ज्या ताकदीने झळकते ती आज तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात प्रदीपच्या माध्यमातून देशभर पसरत आहे हे खरोखर अभिमानास्पद आहे. प्रदीप नारायणकर यांनी ग्रामीण पार्श्वभूमी असूनही तंत्रज्ञानाच्या माध्यमातून स्वतःचा ठसा उमटवला आहे. त्यांनी स्थापन केलेल्या 'पीएचएन टेक्नॉलॉजी'

कंपनीतून आज रोबोटिक्स बुद्धिमत्ता आणि संगणकीय प्रणाली या क्षेत्रातील विविध अत्याधुनिक प्रकल्पांवर काम सुरू आहे.त्यांनी केवळ पुण्यात कंपनी स्थापन करून थांबले नाहीत तर आपल्या मूळ गावाशीही घट्ट नाळ जोडलेली असुन पाटोद्याच्या शाळा आणि महाविद्यालयांमध्ये ते सातत्याने भेट देऊन विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानविषयक मार्गदर्शन करतात त्यांना प्रेरणा देतात आणि रोजगाराच्या संधी निर्माण करतात. आमदार सुरेश धस यांनी त्यांच्या या कार्याची मनःपूर्वक प्रशंसा करत म्हटले की, प्रदीपसारखे युवक आपल्या मतदारसंघाचे खरे प्रतिनिधी आहेत. आपल्या कष्टातून आणि बुद्धिमत्तेतून त्यांनी पाटोद्याची मान उंचावली आहे.अशा तरुणांकडून देशाच्या प्रगतीला नव्या दिशा मिळतात.त्यांनी प्रदीप नारायणकर आणि त्यांच्या 'पीएचएन टेक्नॉलॉजी प्रा.लि.या कंपनीच्या सर्व भावी उपक्रमांसाठी शुभेच्छा दिल्या.

## यश ढाका खून प्रकरणातील संशयित आरोपी गणेश शिराळे याच्यावर गुन्हा नोंद करत अटक करा -वर्षाताई जगदाळे

बीड । प्रतिनिधी

यश ढाका खून प्रकरणात पोलिसांनी अद्यापही संशय मास्तर माईंड गणेश शिराळे याला चौकशीसाठी ताब्यात घेतले नसून पोलिसांची भूमिका ही संशयास्पद वाटत असल्याने ढाका कुटुंबीयांच्या न्यायाच्या लढ्यात महाराष्ट्र निर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या आदेशाने जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यरसमोर निर्माण सेनेकडून एक दिवसीय धरणे आंदोलन आयोजित केले होते. या धरणे आंदोलनामध्ये मोठ्या संख्येने कार्यकर्त्यांसह सामाजिक संघटनेच्या व नागरिकांचा सहभाग दिसला. यावेळी बोलताना महाराष्ट्र निर्माण सेनेच्या राज्य उपाध्यक्ष वर्षाताई जगदाळे यांनी म्हटले एक महिना होऊन गेला अद्यापही या प्रकरणाचा मास्टरमाइंड गणेश शिराळे याला अटक करण्यात आली नसून पोलिसांची भूमिका स्वयंशास्पद वाटत आहे. गणेश शिराळे याला अटक करा यासह हे प्रकरण एस आय टी कडे वर्ग करत प्रकरण पाच ट्रॅक कोर्ट मध्ये चालवण्यात यावे. तसेच यश ढाका हत्या प्रकरणात इतर आरोपींचाही सहभाग दिसून येत आहे सीसीटीव्हीच्या आधारे त्यांचीही चौकशी करावी, आधी मागण्या जिल्हा पोलीस प्रशासनाकडे धरणे आंदोलनाच्या माध्यमातून मनसेकडून मांडण्यात आल्या.२५ ऑक्टोबर रोजी सायंकाळी आठ ते साडेआठ दरम्यान शहरातील माने कॉम्प्लेक्स परिसरात किरकोळ वादावरून यश ढाका या २० वर्षीय तरुणाची हत्या करण्यात आली.यातील आरोपीसुरज काटे, सोमनाथ काटे,निखिल घोडके , कृष्णा सोनवणे,यांना अटक करण्यात आली असून सध्या सर्व आरोपी मध्यवर्ती कारागृहात आहेत . या घटनेचा सूत्रधार व मास्टरमाइंड सात गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यात आरोपी असलेला व मोक्का अंतर्गत कारवाई झालेला संशयित आरोपीगणेश शिराळे अद्यापही फरार आहेत. या घटनेला एकमहिन्याचाकालावधी लोटला आहे.गणेश शिराळे याला अजूनही पोलिसांनी आरोपी केले नसून आज पर्यंत चौकशीसाठी त्याला नोटीसही देण्यात आलेली नाही सदरील घटनेची तात्काळ गंभीर दखल गृहमंत्र्यांनी घ्यावी यासाठी हे धणे आंदोलन करण्यात आले असून या आंदोलनाच्या वेळी वर्षाताई जगदाळे यांच्यासह महिला जिल्हाध्यक्ष कुटे ताई, निर्भीड पतकार संघाच्या जिल्हाध्यक्षा किरण डोळस, जिल्हा सचिव आम्रपाली साबळे, आशाताई घुले, यांच्यासह वंचित बहुजन आघाडीचे युवा जिल्हाध्यक्ष अनुरथ वीर, पँथर संघटनेचे जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे, माजी नगरसेवक रामसिंग टाक, एडवोकेट सत्यनारायण ढाका, आर्या प्रतिष्ठानचे स्वप्निल हातागळे, आकाश कडेरे, युवराज गोडसे, यांच्यासह ढाका कुटुंबीय, यश याचा मित्रपरिवार, यासह वाल्मीक समाजाचे बांधव तसेच बीड शहरातील सुजान नागरिकासह महाराष्ट्र निर्माण सेनेचे कार्यकर्ते या धरणे आंदोलनात सहभागी झाले होते.



### आठ दिवसात गणेश शिराळे याला हजर करणार -पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत

आंदोलन खर्चाची भेट घेत जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी कायद्याच्या सर्व बाजूचा अभ्यास करत या प्रकरणातील संशयित असलेला आरोपी गणेश शिराळे याला कायदेशीर नोटीस देत हजर करण्यात येणार असल्याचे म्हटले आहे. सदर पकरणाचा तपास पोलीस उपाधीक्षक पूजा पवार यांच्याकडे असून लवकरच सर्व तपास पूर्ण करत या प्रकरणातील कोणत्याही आरोपीला सोडण्यात येणार नसल्याचे नवनीत कावत यांनी म्हटले आहे, पीडित ढाका कुटुंबीयांसोबत पोलीस प्रशासन खंबीरपणे उभे आहे असेही यावेळी पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी म्हटले आहे.

## एमआयएमकडून निवडणुकीसाठी उमेदवारांना आवाहन

### सामाजिक कार्याची फाइल व बायोडाटा जमा करा - शिवाजी भोसकर, सय्यद सैफअली

बीड । प्रतिनिधी

येणाऱ्या नगरपालिका ,जिल्हा परिषद, पंचायत समिती व नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन (एमआयएम) पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष बॅरिस्टर असदुद्दीन औवेसी, प्रदेश अध्यक्ष मा.खा.इम्तियाज जलील साहेब, प्रदेश सरचिटणीस समीर साजीद बिल्डर, मा मराठवाडा अध्यक्ष फेरोज लाला साहेब यांच्या आदेशानुसार मा बीड जिल्हा अध्यक्ष ड शेख शफीक भाऊ यांच्या सुचनेनुसार बीड जिल्ह्यातील इच्छुक उमेदवारांना आपली कागदपत्रे जमा करण्याचे आवाहन केले आहे. पक्षाच्या वतीने हे आवाहन जारी करण्यात आले असून, निवडणूक लढवण्याच्या इच्छुकांना आपले बायोडाटा, सामाजिक कार्याची फाइल व इतर आवश्यक कागदपत्रे पक्षाच्या





कार्यालयात सादर करावीत, असे सुचित करण्यात आले आहे.

माहितीनुसार, महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाने बीड जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीची तयारी जोरदार सुरू केली असून, नगरपालिका ,जिल्हा परिषद व पंचायत समितीसाठी प्रारंभिक आरक्षणाची अधिसूचना १५ ऑक्टोबर २०२५ रोजी जारी झाली आहे. यामुळे निवडणुकीची रिंगण उत्तुंग होण्याची शक्यता आहे. एमआयएम पक्षाने या संधीचा लाभ घेण्यासाठी इच्छुकांना प्रोत्साहन देताना, त्यांच्या सामाजिक योगदानावर व योग्य चांगल्या लोकांची उमेदवारीची निवड केली जाईल, असे स्पष्ट केले आहे

पक्षाच्या बीड जिल्हा कार्यालयातून जारी केलेल्या आवाहनात म्हटले आहे की, नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती (नगराध्यक्ष , नगरसेवक, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य आदी) निवडणूक लढवण्याच्या इच्छुकांनी आपले बायोडाटा, सामाजिक कार्याची सविस्तर माहिती असलेली फाइल व इतर कागदपत्रे तात्काळ जमा करावीत. पक्षाच्या तत्त्वांनुसारच उमेदवारी दिली जाईल. हे आवाहन पक्षाच्या स्थानिक नेत्यांनी दिले असून, इच्छुकांनी ०३-११-२५ पर्यंत जमा करावी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. बीड जिल्ह्यात एमआयएमचा प्रभाव वाढत असल्याने या निवडणुकीत पक्षाची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. जिल्हा निवडणूक विभागानेही उमेदवारांसाठी आवश्यक मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केली असून, नामांकन प्रक्रियेची तारीख लवकरच जाहीर होण्याची शक्यता आहे. इच्छुक उमेदवारांनी पक्षाच्या कार्यालयात संपर्क साधावाअसे आवाहन आहे.शिवाजी भोसकर सय्यद सैफ अली यांनी केले आहे.




# राज्यात ई-पीक पाहणीला चौथ्यांदा मुदतवाढ

## आता शेतकरी ३० तारखेपर्यंत करू शकतात नोंदणी

पुणे : राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये आलेली पूरसदृश परिस्थिती, अवकाळी पाऊस आणि दुबार पेरणी यामुळे खरीप हंगाम २०२५ च्या ई-पीक पाहणी नोंदणीत अडथळे आले. आलेल्या अडथळ्यांची दखल घेत महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेऊन ई-पीक पाहणी नोंदणीला ३० नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ दिली आहे.

महसूल विभागाने यासंदर्भात परिपत्रक जारी केले असून राज्यात खरीप हंगाम २०२५ साठी शेतकरी स्तरावरून पीक नोंदणी करण्याची मुदत ३० सप्टेंबर रोजी संपली होती. त्यानंतर १ ऑक्टोबरपासून सहायक स्तरावरून नोंदणी सुरू करण्यात आली होती, ती मुदत २९ ऑक्टोबर होती. मात्र, नैसर्गिक संकटामुळे मोठ्या प्रमाणावर पीक नोंदणी होऊ शकली नाही. आकडेवारीनुसार, आतापर्यंत डिजिटल क्रॉप सर्व्हेअंतर्गत राज्यातील एकूण क्षेत्रापैकी केवळ ३६.१२% पिकांचीच नोंद पूर्ण झाली आहे. पीक नोंदणी न झाल्यामुळे शेतकरी नैसर्गिक आपत्ती, पीक विमा आणि पीक कर्ज यासारख्या महत्त्वाच्या लाभांपासून वंचित राहू नयेत यासाठी ही मुदतवाढ देण्यात आली आहे.

# भाजीपाला पिकांचे कीड आणि रोगांचे नियंत्रण



सध्याच्या ढगाळ वातावरणात भाजीपाला पिकावर वेगवेगळ्या रोगाचा आणि किडींचा प्रादुर्भाव वाढताना दिसत आहे. वेळीच या रोग आणि किडीचे व्यवस्थापन केले नाही तर नुकसान होऊ शकते.

भाजीपाला पिकाचे व्यवस्थापन : वेलवर्गीय भाजीपाला पिकांवर भुरीचा प्रादुर्भाव होऊन उत्पादन आणि गुणवत्तेत घट होऊ शकते. भुरी रोगावर प्रतिबंधात्मक उपाय हेच नियंत्रणाची सर्वात योग्य पद्धती आहे, कारण एकदा पिकावर या रोगाचा प्रादुर्भाव झाल्यास नियंत्रण करणे काठी असते, यासाठी वेलींचे सतत निरीक्षण करावे.

भुरी रोग प्रतिकारक वाणांची लागवड : नत्र खताच्या अति वापरामुळे भुरी रोगाची तीव्रता वाढते, तर पोटॅश खतामुळे पिकाची अंतर्गत रोग प्रतिकारशक्ती वाढून रोगाची तीव्रता कमी होते. यासाठी वेगवेगळ्या अन्नद्रव्यांचा समतोल प्रमाणात वापर करावा दाटीवाटीने वाढलेल्या पिकामध्ये रोग प्रसारासाठी अनुकूल सूक्ष्म हवामान बनते व रोगाची तीव्रता वाढते यासाठी पिकांच्या ओळीमध्ये हवा खेळती राहील अशाप्रकारे रोपांची संख्या ठेवावी. भुरी रोगाच्या प्रतिबंधासाठी हवामानानुसार ८ ते १० दिवसांच्या अंतराने, मेप्टिलडीनोकॅप (३७.५ ) फवारणी करा. ०.७ मिली किंवा हेक्साकोनाझोल (५ ईसी) १ मि.ली. किंवा डायफेनोकोनाझोल (२५ ईसी) ०.५ मि.ली. प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. भाजीपाला पिकांवरील फुलकिडी/थ्रीप्सचे नियंत्रण करण्यासाठी फिप्रोनिल १५ मिली प्रति १० लीटर पाणी याप्रमाणे फवारणी करावी. रोपवाटिकेत वांगी, मिरची, टोमॅटो इ.

भाजीपाला रोपांच्या जोमदार वाढीसाठी,पेरणीनंतर १५दिवसांनी प्रति वाफा ५० ग्रॅम युरिया खताची मात्रा द्यावी. भाजीपाला रोपे पुनर्लागवड करावयाच्या शेतात जमीन वाफसा स्थितीत असताना मशागतीची कामे सुरू करावीत. उन्हाळी कांद्याच्या लागवडीसाठी गादी वाफे करून रोपे तयार करण्यासाठी बियाणे पेरणी करावी व उन्हाळी हंगामासाठी शिफारशीत सुधारित जातींचा वापर करावा. बियाणे पेरणीपूर्वी अझोस्पिरिलम + पी.एस.बी.या जीवाणू संवर्धनाचा वापर करावा. टोमॅटो पिकावरील करपा आणि रसशोषक किडींच्या नियंत्रणासाठी टेब्युकोनाझोल (२९.५ ) १ मिली अधिक फिप्रोनील (५) १.५ मि.ली.च्या किंवा थायामेथोक्सम (२५ डब्ल्यूजी) ०.४ ग्रॅम किंवा कार्बोसल्फॉन (२५ ईसी) १ मिली प्रति लिटर पाणी याप्रमाणे बियाणे उगवल्यानंतर १० दिवसांच्या अंतराने आलटून पालटून दोन ते तीन वेळा फवारणी करावी.

# जपानी रेड डायमंड पेरुची 'अशी' करा शेती

रेड डायमंड पेरु शेतकऱ्यांमध्ये खूप लोकप्रिय आहे. या पेरुचा दर खूप जास्त असून, बाजारात १०० ते १५० रुपये किलोने विकला जातो. हा पेरु त्याच्यातील चव आणि गोडवा यासाठी खूप लोकप्रिय आहे. या पेरुची लागवड करून शेतकरी काही वर्षांत श्रीमंत होऊ शकतात.

भारतातील बहुतेक शेतकरी पारंपारिक शेतीऐवजी अपारंपारिक पिकांची लागवड करत आहेत. या प्रयत्नात ते यशस्वी होत आहेत आणि चांगली कमाई करत आहेत. बहुतांश शेतकरी विविध प्रकारच्या फळांची लागवड करतात. आजकाल रेड डायमंड पेरू देशातील खूप लोकप्रिय आहे. जपानी रेड डायमंड पेरुचा दर खूप जास्त आहे, बाजारात १०० ते १५० रुपये किलो दराने विकला जातो. देशातील अनेक राज्यांमध्ये शेतकऱ्यांनी या जातीच्या पेरुची लागवड करण्यास सुरुवात केली असून त्यातून त्यांना चांगले उत्पन्न मिळत आहे.

योग्य हवामान आणि माती : रेड डायमंड पेरुच्या लागवडीसाठी १० अंश ते ४२ अंश सेल्सिअस तापमान योग्य मानले जाते. परंतु तापमान थोडे कमी झाले तरी त्याचा उत्पादनावर परिणाम होत नाही. या जातीच्या पेरुच्या लागवडीसाठी काळी किंवा वालुकामय चिकणमाती चांगली मानली जाते, तसेच जमिनीचा (सामू) ७ ते ८ असावी.

रोप लागवड आणि रोपातील अंतर : जपानी रेड डायमंड पेरुची रोपे लावताना तुम्हाला त्यांच्यामधील जागेची विशेष काळजी घ्यावी लागेल. एका ओळीपासून दुसर्या ओळीपर्यंतचे अंतर सुमारे ८ फूट ठेवावे आणि रोपापासून रोपापर्यंतचे अंतर ६ फूट ठेवावे.

चांगल्या वाढीसाठी शेतकर्यांना वर्षातून दोनदा रोपांची छाटणी करावी लागते. जेव्हा त्याचे फळ चिकूच्या आकाराचे होते तेव्हा आपण ते फळ पिशवी किंवा वर्तमानपत्राने झाकून ठेवावे. असे केल्याने पेरू पिकण्याची प्रक्रिया सुधारते आणि फळांवर डाग दिसत नाहीत.

खत आणि सिंचन : रेड डायमंड पेरुची लागवड करण्यासाठी शेतकर्यांनी शेणखत आणि गांडूळखत यांचा पिकांमध्ये वापर करावा. याशिवाय, एनपीके सल्फर, मॅग्नेशियम सल्फेट, कॅल्शियम नायट्रेट आणि बोरॉन यासारखी रासायनिक खते वापरू शकता. रेड डायमंड पेरुच्या झाडांना पाणी देण्यासाठी शेतकरी ठिबक सिंचन पद्धतीचा वापर करतात. याशिवाय वेळोवेळी सामान्य सिंचन देखील आवश्यक आहे.

रेड डायमंड पेरू पासून होणारी कमाई : जपानी रेड डायमंड पेरू सामान्य पेरुसारखा दिसतो. पण आतून तो टरबूजासारखा लाल असतो आणि बाहेरून तो नाशपातीसारखा गोड असतो. बाजारपेठेत स्थानिक पेरुचा भाव ५० ते ६० रुपये प्रति किलो तर जपानी रेड डायमंड पेरू १०० ते १५० रुपये किलो दराने विकला जातो.

या पेरुची लागवड करून शेतकरी सामान्य पेरूपेक्षा ३ पट अधिक उत्पन्न मिळवू शकतात. या जातीच्या पेरुची लागवड करण्यासाठी खर्च सुद्धा कमी येतो.



# म्हशींमधील प्रजनन व्यवस्थापनाचे नियोजन

हिवाळा ऋतू म्हशींच्या प्रजननासाठी अनुकूल असतो. कारण उष्णतेचा कमी ताण, चाऱ्याची मुबलक उपलब्धता, पोषक हवामानामुळे गर्भधारणा दर चांगले असतो. तरीदेखील, काही गैरहंगामी कारणांमुळे म्हशींमध्ये वंध्यत्व आढळू शकते. त्यामुळे, योग्य निदान आणि उपचार करणे अत्यंत गरजेचे असते.

माजाची योग्य ओळख : हिवाळ्यातसुद्धा काही म्हशी मुका माज दाखवतात.दररोज सकाळी आणि संध्याकाळी म्हशीचे निरीक्षण करावे. हलकेसे ओरडणे, शेपूट उचलणे, वारंवार लघवी करणे ही लक्षणे दिसतात. टीझर बूल, माजाची लक्षणे ओळखणाऱ्या साधनाचा वापर करावा.

कृत्रिम रेतन व्यवस्थापन : माजाची पहिली लक्षणे दिसल्यावर १२ ते १८ तासांनी कृत्रिम रेतन करावे.

उच्च गुणवत्तेच्या रेतमात्रांचा वापर करावा. कृत्रिम रेतनाच्या वेळेस स्वच्छता ठेवावी.

ताण कमी करण्याचे उपाय : अतिशय कमी हाताळणी करावी. अचानक बदल टाळावा. उबदार, स्वच्छ व आरामदायक निवारा द्यावा. गोठा कोरडा ठेवावा. गोठा हवेशीर असावा.

फायदेशीर हिवाळा : हिवाळ्यात तणाव कमी प्रमाणात असतो. त्यामुळे माजाचे लक्षणे अधिक



स्पष्ट व लांब काळ दिसतात.योग्य वेळी गर्भधारणा (कृत्रिम रेतन किंवा नैसर्गिक संगम) शक्य होते. प्रारंभिक भ्रूण मृत्यूचे प्रमाण कमी होते. गाभण राहण्याचे प्रमाण वाढते. हिवाळ्यात हायपोथॅलॅमस-पिट्यूटरी-गोनॅडल ॲक्सिस चांगले कार्य करते.यामुळे संप्रेरक संतुलन चांगले राहते.नियमित माजाचे ऋतुचक्र असते. माजाची स्पष्ट लक्षणे दिसतात. अधिक स्त्रीबीजत्सर्ग दर असतो.चांगल्या प्रतीचे स्त्रीबीज आणि भ्रूण प्राप्ती होते.

आरोग्य व्यवस्थापन : हिवाळ्यात पोषणयुक्त हिरवा चारा उपलब्ध असतो. त्यामुळे जनावरांचा बॉडी कंडिशन स्कोअर सुधारतो.संप्रेरक क्रिया सुधारते. गर्भाशयाचे आरोग्य आणि भ्रूणविकासासाठी उपयुक्त ठरते. म्हशींना गडद त्वचा, कमी घामग्रंथी आणि जाड त्वचेमुळे उष्णतेचा ताण अधिक होतो. हिवाळ्यात हवामान थंड व आरामदायक असते, जे म्हशींसाठी कमी तणावदायक असते. उष्णतेचा ताण असल्यास माजाची लक्षणे कमी स्पष्ट दिसतात किंवा मुका माज दिसतो. संप्रेरकाचे संतुलन बिघडते. स्त्रीबीजत्सर्ग आणि भ्रूणाच्या जिवंत राहण्यावर परिणाम होतो.

संसर्गाचे नियंत्रण : प्रसूतीसाठी स्वच्छ निर्जंतुकीकरण केलेली कोरडी जागा निवडावी. कृत्रिम रेतनानंतर संसर्ग संशयित असल्यास पशुवैद्यकाचा सल्ला घ्यावा. वंध्यत्वाचा प्रकार आणि कारणे : माजावर न येणे अपुरा आहार, मुका माज, संप्रेरकांचे असंतुलन. रिपीट ब्रीडिंग (उलटणे ) गर्भाशयातील संसर्ग, कृत्रीम रेतनाची वेळ आणि पद्धत. अपरिपक्वता अपुरे पोषण, खनिज मिश्रण, जीवनसत्त्वांची कमतरता. प्रसूतिपश्चात वंध्यत्व गर्भाशय संसर्ग, अपूर्ण गर्भाशय आकुंचन, अडकलेले अपत्य, वेळेवर वार न पडणे.

पोषण व्यवस्थापन : हिवाळ्यात हिरवा चारा मुबलक प्रमाणात उपलब्ध असतो, परंतु हिवाळ्यातसुद्धा पोषणाची कमतरता वंध्यत्वास कारणीभूत ठरते.




## महत्वाच्या घटना

१६८३ : छत्रपती संभाजी राजे यांच्या फौजेने फोंडा येथे अद्वितीय पराक्रम करून पोर्तुगिजांचा पराभव केला.

१७५५ भुकंप आणि सुनामीमुळे पोर्तुगालमधील लिस्बन शहर पूर्णपणे उद्ध्वस्त झाले तर सुमारे ६०,००० ते ९०,००० लोक ठार झाले.

१८७० : मेरिकेत हवामान विभागाने पहिला अधिकृत हवामान अंदाज सांगितला.

१८४५ : मुंबईत आधुनिक पाश्चात्य पद्धतीचे वैद्यकीय शिक्षण देणाऱ्या आद्य ग्रँट मेडिकल कॉलेज या पहिल्या वैद्यकीय महाविद्यालयाचा प्रारंभ झाला.

१८४८: महिलांसाठी पहिले वैद्यकीय महाविद्यालय बोस्ट, मॅसेच्युसेट्स, यूएसए येथे सुरू झाले. नंतर याचे बोस्टन विश्वविद्यालयात विलीनीकरण झाले.

१८९६ : नॅशनल जिओग्राफिक मॅगझिनमध्ये पहिल्यांदाच नग्न चित्र प्रकाशित झाले.

१९२५ : गोविंदराव देशमुखांच्या अध्यक्षतेखाली मध्यप्रांत वऱ्हाडातील स्वराज्य पक्षाच्या तिन्ही प्रांतिक समित्यांची एक अनौपचारिक संयुक्त बैठक झाली.

१९२८ : हिंदुस्थान सरकारने आपल्याला हवे तसे बदल विधेयकात करून त्याचे कायद्यात रुपांतर केले आणि नवी महसूल संहिता वऱ्हाडात लागू करण्यात आली.

१९४५ : ऑस्ट्रेलियाचा संयुक्त राष्ट्रांत प्रवेश.

१९५६ : भारतामध्ये भाषावार प्रांतरचना अस्तित्त्वात आली.

१९५६ : आंध्र प्रदेश राज्याची निर्मिती झाली. त्यावेळी कुर्नुल ही त्याची राजधानी होती.

१९५६ : दक्षिण भारतातील कन्नड भाषिक प्रदेश एकत्र करुन कर्नाटक राज्याची स्थापना करण्यात आली.

१९५६ : केरळ राज्य स्थापना दिन.

१९५६ : कन्याकुमारी जिल्हा केरळ मधुन तामिळनाडूमध्ये हस्तांतरित करण्यात आला.

१९६६ : पंजाब राज्याची पंजाब व हरियाणा राज्यात विभागणी झाली.

१९६८ : मोशन पिक्चर असोसिएशन ऑफ अमेरिकाच्या फिल्म रेटिंग सिस्टीमची अधिकृतपणे सुरवात झाली.

१९७३ : मैसूर राज्याचे नाव बदलुन ते कर्नाटक असे करण्यात आले.

१९७३ : लखदीप, मिनिकॉय, अग्निदीव बेटांचे नांव लक्षद्वीप असे ठेवण्यात आले.

१९८२ : अमेरिकेत मोटारगाड्यांचे उत्पादन करणारी होंडा ही पहिली आशियाई कंपनी बनली.

१९९३ : औपचारिकपणे युरोपियन युनियन स्थापन झाले.

१९९४ : मराठी चित्रपटसृष्टीतील विशेष कामगिरीचा गौरव म्हणून चित्रपट निर्माते, दिग्दर्शक व लेखक दिनकर द. पाटील यांची चित्रभूषण पुरस्कारासाठी निवड करण्यात आली.

१९९९ : कवी नारायण सुर्वे यांना मध्यप्रदेश सरकारचा कबीर पुरस्कार हा मानाचा पुरस्कार जाहीर करण्यात आला.

२००० : सर्बियाचा संयुक्त राष्ट्रांत प्रवेश.

२००५ : योगेशकुमार सभरवाल यांनी भारताचे वे३६ सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.

१९५६ : द्विभाषिक मुंबई राज्याची निर्मिती

## जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८८८ : चित्रकार, नेपथ्यकार, रंगभूमिविषयक ग्रंथांचे लेखक पुरुषोत्तम श्रीपत काळे यांचा जन्म.

१८९३ : शीख धर्माचा समग्र इतिहास लिहिणारे आधुनिक बंगाली इतिहासकार इंदुभूषण बॅनर्जी यांचा जन्म. (मृत्यू: १३ नोव्हेंबर १९५६ कोलकता, पश्चिम बंगाल)

१९१८ : विनोदी अभिनेते शरद गणेश तळवळकर यांचा जन्म. (मृत्यू: २१ ऑगस्ट २००१)

१९२६ : संगीत दिग्दर्शक कवी रेडिओ वरील सुगम संगीत विभाग प्रमुख, शब्द प्रधान गायकी चे लेखक यशवंत देव यांचा पेण येथे जन्म.

१९३२ : कवी अरुण बाळकृष्ण कोलटकर यांचा कोल्हापूर येथे जन्म.

१९४० : भारताचे वे३५ सरन्यायाधीश रमेश चंद्र लाहोटी यांचा जन्म.

१९४५ : महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक नरेंद्र दाभोलकर यांचा जन्म. (मृत्यू: २० ऑगस्ट २०१३)

१९६० : अपल इन्कचे सध्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी टीम कूक यांचा जन्म.

१९६३ : भारतीय उद्योजीका नीता अंबानी यांचा जन्म.

१९७३ : अभिनेत्री ऐश्वर्या राय यांचा जन्म.

१९७४ : क्रिकेटपटू वी. वी. एस. लक्ष्मण यांचा जन्म.

## मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८७३ : बंगाली नाटककार दीनबंधू मित्र यांचे निधन.

१९५० : जागतिक ख्यातीचे बंगाली साहित्यिक बितीभूषण बंदोपाध्याय यांचे निधन. (जन्म: १२ सप्टेंबर १८९४)

१९८८ : ज्येष्ठ राष्ट्रीय कीर्तनकार गोविंदस्वामी आफळे यांचे पुणे येथे निधन.

१९९१ : संगीतकार व संगीत संयोजक अरुण पौडवाल यांचे निधन.

१९९३ : ठुमरी, दादरा व गझल गायिका नैनोदेवी यांचे निधन.

१९९४ : शेती आणि पाणी विषयाचे तज्ञ, कामगार नेते कॉम्रेड दत्ता देशमुख यांचे निधन.

१९९६ : श्रीलंकेचे दुसरे राष्ट्राध्यक्ष ज्युनिअस जयवर्धने यांचे निधन. (जन्म: १७ सप्टेंबर १९०६)

२००५ : लेखिका योगिनी जोगळेकर यांचे निधन. (जन्म: ६ ऑगस्ट १९२५)

२००७ : भारतीय दिग्दर्शक आणि पटकथा लेखक एस. अली रझा यांचे निधन.

राज्य लोकतंत्र मराठवाडा वृत्तांत
शनिवार दि.१ नोव्हेंबर २०२५ ५

# अतिवृष्टीच्या अनुदानासाठी शेतकऱ्यांनी कागदपत्र जमा करावे-तहसीलदार



अंबड । प्रतिनिधी

सन २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीच्या अनुषंगाने, शासन निर्णय २९ ऑक्टोबर २०२५ व २० ऑक्टोबर २०२५ अन्वये अनुदान वितरणाची कार्यवाही सुरू झाली आहे. या संदर्भात, तहसील कार्यालयास २२ गावांच्या लाभार्थी याद्या प्राप्त झाल्या आहेत. यापूर्वी स्थापन करण्यात आलेल्या त्रिस्तरीय समितीने केलेल्या पंचनाम्यांच्या आधारे, संबंधित तलाठी, ग्रामसेवक व कृषी सहाय्यक यांच्या स्वाक्षरीसह या याद्या अंतिम करण्यात आल्या आहेत. सदर याद्यांना उपविभागीय दंडाधिकारी, उमाकांत पारधी, यांच्याकडून तात्काळ मंजुरी देण्यात आलेली असून, यादीतील सर्व लाभार्थ्यांची नावे शासकीय पोर्टलवर अपलोड करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. खातेदारांचे एकूण ७,६०० नावे पोर्टलवर यशस्वीरित्या अपलोड करण्यात आली आहेत. याबाबत ज्या लाभार्थ्यांकडे फार्मर आयडी आहे, त्यांना केवायसी करण्याची आवश्यकता नाही. शेतकऱ्यांनी तात्काळ आपापल्या भागातील तलाठी यांच्याकडे आधार कार्ड (प्रत) बँक पासबुक (प्रत) मोबाईल नंबर, फार्मर आयडी (असल्यास) सादर करावे.

उर्वरित सर्व लाभार्थ्यांच्या याद्या पुढील दोन दिवसांच्या आत अपलोड करण्यात येतील. पोर्टलवर याद्या अपलोड करून मंजुरी प्राप्त झाल्यानंतर, सदर याद्या व संबंधित क्रमांक प्रत्येक गावात प्रसिद्ध करण्यात येतील. त्या यादीवर कोणाचा आक्षेप असल्यास, कृपया लेखी पुराव्यांसह तहसील कार्यालयात संपर्क साधावा, जेणेकरून त्यात योग्य ती दुरुस्ती करता येईल. सदर यादीमध्ये कोणत्याही परिस्थितीत अपात्र व्यक्तीची नावे येऊ नयेत व एकही पात्र लाभार्थी वंचित राहू नये, हा प्रशासनाचा मुख्य उद्देश आहे. शेतकऱ्यांनी कोणत्याही दलालांमार्फत चुकीची माहिती देऊन किंवा खोटी माहिती देण्याचा प्रयत्न करू नये. अशा कृत्यांमुळे खऱ्या लाभार्थ्यांना व प्रामाणिकपणे काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना त्रास होतो. असे कृत्य केल्यास, संबंधित व्यक्तीवर कठोर कारवाई करण्यात येईल. असे आदेश जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांचे आहे उपविभागीय दंडाधिकारी, उमाकांत पारधी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडत आहे. तहसीलदार विजय चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली, सर्व मंडळ अधिकारी, तलाठी, आणि कार्यालयातील कर्मचारी (श्री. वालेकर, श्री. भागवत, श्री. देशमुख) हे काम पूर्ण करण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेत आहेत.

# बोगस शिक्षकांचा सुळसुळाट २०; वर्षापासून शासनाच्या तिजोरीची लूट

जालना। प्रतिनिधी

कै नानासाहेब पाटील माध्यमिक विद्यालय नजीक पांगरी ता बदनापुर येथील मुख्याध्यापक तथा संस्थेचे सचिव प्रल्हाद पांडुरंग वाघ, तत्कालीन शिक्षणाधिकारी रमेश गवळी,रमेश तांगडे व वेतन अधीक्षक यांनी संगनमताने गेल्या २०वर्षापासून नियमबाह्य व बोगस नियुक्तीच्या आधारे शासनाची फसवणूक करून वेतनापोटी लाखो रुपयांची लूट केली आहे.

प्रल्हाद पांडुरंग वाघ हे कै नानासाहेब पाटील शिक्षण संस्था नाव्हा संचलित कै नानासाहेब पाटील विद्यालय नजीक पांगरी ता बदनापूर या विद्यालयाचे कार्यरत मुख्याध्यापक व संस्थेचे सचिव आहेत ते दि१८/६/२००५ रोजी सहशिक्षक या पदावर शाळेत रुजू झाले परंतु त्यांची शैक्षणिक पात्रता त्यावेळेस केवळ एम ए असताना तत्कालीन शिक्षणाधिकारी रमेश गवळी यांनी त्यांना कागदपत्राची पडताळणी न करता एम ए बी एड असे वैयक्तिक मान्यता आदेश पारित केले व त्यास तत्कालीन शिक्षणाधिकारी रमेश तांगडे यांनी सेवा सातत्य सुद्धा दिले याच दिवशी म्हणजे दिनांक १८/६/२००५ ला प्रल्हाद पांडुरंग वाघ यांनी बी एड या अभ्यासक्रमासाठी शासकीय




अध्यापक महाविद्यालय आंबेजोगाई या ठिकाणी प्रवेश घेतला होता. एक व्यक्ती एकाच वेळेस दोन ठिकाणी हजर राहू शकत नाही ही बाब माहितीच्या अधिकारात उघड झाली.याविषयी तक्रार प्रभाकर गणपत ढाकणे, दत्तू नामदेव एखंडे व गौतम कचरू खरात या कर्मचाऱ्यांनी शिक्षण आयुक्त, शिक्षण संचालक, शिक्षण उपसंचालक, एस आय टी प्रमुख चंद्रकांत फुलकुंडवार, सदस्य हारुण दातार यांच्याकडे केली आहे. बोगस नियुक्ती द्वारे हडपलेले वेतन व्याजासह शासन दरबारी जमा करून दोषींवर प्रशासकीय व कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी तक्रारदार कर्मचाऱ्यांनी केली आहे. आता दोषीवर काय कारवाई होणार? याकडे सर्व शिक्षण प्रेमी व्यक्तींचे लक्ष लागून आहे.

# स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीची तयारी सुरू

## राष्ट्रवादी काँग्रेसच्या दौऱ्याला कार्यकर्त्यांचा गर्दी वाढली

**जालना । प्रतिनिधी**

जिल्ह्यामध्ये अल्प कालावधीत होणाऱ्या जिल्हा परिषद , पंचायत समिती, नगरपरिषद व महानगरपालिका या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या पूर्वतयारीसाठी जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी कडून तालुकावाईज दौऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हयातील सर्वच तालुक्यातील दौ-याचे वेळी कार्यकर्त्यांमध्ये व जनतेकडून चांगला प्रतिसाद मिळाला असल्याचे जिल्हाध्यक्ष अरविंदराव चव्हाण म्हणाले. या जिल्हा दौ-यावळी चव्हाण म्हणाले की, पक्षाच्या प्रत्येक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी आगामी होणाऱ्या निवडणुकीत मोठ्या जोमाने तयारीला लागून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला घवघवीत यश जिल्ह्यामध्ये संपादन करून द्यावे असे आवाहन माजी आमदार तथा जिल्हाध्यक्ष अरविंद चव्हाण यांनी केले. या दौऱ्यात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष मधुकर आर्दड, माजी आ. सुरेशकुमार जेथलिया ,माजी आ. शिवाजीराव चोथे, प्रदेश सरचिटणीस रवींद्र तौर, जिल्हा कार्याध्यक्ष चंद्रकांत कारके, प्रदेश सरचिटणीस शकुंतलाताई कदम, प्रदेश सरचिटणीस बळीराम कडपे, जि. प.चे माजी उपाध्यक्ष महेंद्र पवार, माजी जिल्हा परिषद सदस्य जयमंगल जाधव, अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष शहा आलम



खान, जिल्हा उपाध्यक्ष अण्णासाहेब चित्तेकर, सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष प्रभाकर घेंवदे , महिला जिल्हाध्यक्षा मंगला पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. यापुढे बोलताना जिल्हाध्यक्ष अरविंदराव चव्हाण म्हणाले की, अजितदादाच्या कामावर जनतेचा विश्वास आहे. राज्य शासनाच्या अनेक कल्याणकारी योजना दादांच्या माध्यमातून जनतेपर्यंत पोहचल्या आहेत. ना. अजितदादाच्या कतृत्वामुळे जनतेचा कल राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे मोठ्या प्रमाणात आकर्षित होत आहे. सर्व जाती धर्माला सोबत घेऊन चालणारा पक्ष म्हणून राष्ट्रवादी काँग्रेसची ओळख असल्याची जिल्हाध्यक्ष चव्हाण यावेळी म्हणाले. या चार दिवशीय जिल्हा दौऱ्यामध्ये पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष मधुकर आर्दड, माजी आमदार सुरेश जेथलिया, शिवाजीराव चोथे, बळीराम कडपे यांच्या सह पक्षाच्या अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी जिल्हयात पक्षवाढी संदर्भात व येणा-या निवडणूकी संदर्भात मार्गदर्शन केले. दौ-यामध्ये तालुकाध्यक्ष कैलास मदन, संतोष ढेंगळे, सुरेश सपाटे, दत्तू अंभोरे, सतीश ढवळे, बाबासाहेब गाडगे, दिलीप चव्हाण, लक्ष्मण कंटुले , प्रताप शिंदे, रामकिसन मेंढरे, बबनराव गाडेकर, प्रभाकर तांबे, परमेश्वर नाईकवाडे, सतीश वाहुळे, अमोल खरात, संदीप पाटोळे, पद्माकर हाडे, शिवचरण बाळराज, शितल बारोटे, राम जोशी, उमेश मोहिते, समाधान राठोड यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्व विभागाचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# गाडीच्या काचेवर काळी फिल्म लावणाऱ्या १६२ वाहनांवर कारवाई

जालना। प्रतिनिधी

जालना शहरात गाडीच्या काचेवर ब्लॅक फिल्म लावणाऱ्या १२६ गाड्यावर कारवाई करण्यात आली. सदरील कारवाई शहर वाहतूक शाखा जिल्हा वाहतक शाखा या पथकाने केली. या कारवाई मध्ये १ लाख ३७००० हजार रुपयांचा दंड आकारण्यात आला.

वाहनाच्या काचेवर बॅल्क फिल्म लावण्यास मनाई असूनही शहरात मोठया प्रमाणावर नियमांचे उत्लघंन होत असल्याचे निदर्शनास येत असून, या संदर्भात नागरिकांकडून अनेक तक्रारी प्राप्त होत असल्याने पोलीस अधिक्षक अजय कुमार बन्सल, अपर पोलोस अधिक्षक आयूष नोपागी व श्री अनंत कुलकर्णी उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी पोलीस निरीक्षक शहर वाहतूक शाखा व सपोनि जिल्हा वाहतूक शाखा यांना व सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना कारवाई बाबत आदेश दिल्याने दिनांक ३० रोजी काळी फिल्म वापरणाऱ्यांवर



वाहनांवर विशेष मोहीम जालना जिल्हयात व जालना शहरात आयोजीत करण्यात करण्यात आली होती. या मोहीमे दरम्यान शहरातील प्रमूख मार्गावर व जिल्हयातील प्रमूख मार्गावर तपासणी करण्यात आली. यात एकूण १६२ कैसेस व एक लाख सदोतीस हजार रुपये दंड वाहनधारकाकडून आकारण्यात आला. मोटार वाहन कायदयान्वधे संबधीत वाहना चालकांवर दंड आकरण्यात आला आहे. तसेच आवश्यक तेथे वाहनांची बॅल्क फिल्म जागेवर काढून टाकण्यात आली आहे. शहर वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक प्रताप इंगळे यांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, कायदा व नियमांचे पालन करून वाहन चालवावे. वाहनांच्या काचा पूर्णपणे पारदर्शक ठेवून बाहतूक शिस्त राखावी. यापूढे वाहनांवर काळी फिल्म लावल्याची आढळून आल्यास सदर वाहनांवर कारवाई करण्यात येईल.

# महाराज मठातून सोन्याची चोरी करणारा चोरटा पकडला

जालना । प्रतिनिधी

जालना शहरामध्ये रंगनाथ महाराज मठातुन भाविकाचे सोने व मोबाईल चोरी झाल्याने आरोपीतांचा शोध घेवुन कारवाई करणेबाबत मा. पोलीस अधीक्षक श्री. अजय कुमार बन्सल यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव यांना सुचना दिल्या होत्या. त्या अनुषंगाने फिर्यादी व फिर्यादीची वहोणी असे न्हावा येथील रंगनाथ मठ येथे दर्शनासाठी गेले असता त्यांच्या जवळील असलेली बॅग ज्यामध्ये कपडे, सोन्याचे दागीने, व मोबाईल असलेली बॅग मठामधुन कुणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेल्यामुळे अज्ञात आरोपी विरुद्ध पोलीस ठाणे तालुका जालना येथे गुरनं. ७१९/२०२५ कलम ३०३(२) भान्यास प्रमाणे गुन्हा दाखल झाला होता. सदर गुन्हयातील आरोपीचा शोध घेत असताना तांत्रिक विश्लेषण व गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळवून सदरचा गुन्हा आरोपी न गणेश विठ्ठल एखंडे वय ४५ वर्ष रा. सोमनाथ जळगाव, याने केल्याची माहिती मिळताच पथक तयार करुन ०२ तासामध्ये आरोपी निष्पन्न करुन त्यास सराफा मार्केट येथुन ताब्यात घेतले. त्याने गुन्हयाची कबुली देवुन गुन्हयातील माल एक बैंग ज्यामध्ये घरगुती वापराचे कपडे, सोन्याचे दागीने व मोबाईल असा रु.८०,०००/- किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला.

# शेतकऱ्यांच्या विहिरी,गोठे रद्द केल्याच्या निषेधार्थ सिल्लोड येथे अर्धनग्न आंदोलन



सिल्लोड

मग्रारोहयो योजनेअंतर्गत मंजूर झालेल्या विहिरी व गाय गोठे रद्द केल्याच्या निषेधार्थ सामाजिक कार्यकर्ते राधाकृष्ण काकडे यांनी गुरुवारी पंचायत समिती कार्यालयासमोर अर्धनग्न आंदोलन केले. गटविकास अधिकारी रत्नाकर पगार यांना निवेदन देऊन शासनाने विहिरी रद्द करू नयेत, अशी मागणी केली.काकडे यांनी सांगितले की, शेतकऱ्यांच्या विहिरींना प्रशासकीय मान्यता मिळालेली होती. मात्र, शासनाने अचानक त्या रद्द केल्या. त्यामुळे शेतकऱ्यांना अनुदान मिळणार नाही. आर्थिक अडचणींमुळे आत्महत्येची वेळ येऊ शकते. त्यामुळे शासनाने निर्णय मागे घ्यावा. या आंदोलनात गंगाधर भुंगे, सागर गवते, समाधान पंडित, अशोक मोरे, अक्षय पाटील, सांडू राकडे, शिवाजी बनकर, अंकुश राकडे, दादाराव जाधव, भानुदास पंडित, पुंजाराम गरुड, कैलास आमटे, नामदेव कदम, दिलीप कुंटे, संजय नाकीरे यांच्यासह अनेक शेतकरी सहभागी झाले होते.

# जालना व बीड येथे जबरी चोरी करणारा आरोपी पकडला

जालना । प्रतिनिधी

जालना व बीड इथे जबरी चोरी करणारा आरोपीला पोलिसांनी पकडून अटक केली. चोरी, घरफोडी, मोटार सायकल चोरीचे एकुण ०६ गुन्हे उघड झाले स्थानिक गुन्हे शाखेने कारवाई केली.

जालना शहरामध्ये जबरी चोरी व मोटार सायकल चोरीच्या गुन्हयातील आरोपीतांचा शोध घेवून कारवाई करणेबाबत मा. पोलीस अधीक्षक श्री. अजय कुमार बन्सल यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव यांना सुचना दिल्या होत्या. दिनांक ०५ जुलै रोजी फिर्यादी यांची आरंभ हॉस्पीटल जालना येथे दोन अनोळखी मोटार सायकलस्वारांनी फिर्यादी यांची पत्नीच्या गळयातील दोन तोळे वजनाची मिनी गंठण हिसकावून घेऊन गेल्याने अनोळखी आरोपी विरुद्ध पोलीस ठाणे तालुका जालना येथे गुरनं. ४५१/२०२५ कलम ३०४(२) भान्यास प्रमाणे गुन्हा दाखल झाला होता. नमुद गुन्हयातील आरोपी तांत्रिक विश्लेषण व गोपनीय बातमीदारामार्फत निष्पन्न करुन आरोपी अशोक उर्फ मुकेश उर्फ मुक्या भिकाजी तरकसे, वय-२४ वर्ष, रा. कन्हैयानगर, जालना याने त्याचे साथीदारासह केले असल्याचे निष्पन्न झाला. त्यामुळे आरोपी अशोक उर्फ मुकेश उर्फ मुक्या भिकाजी तरकसे रा. कन्हैया नगर, याचा शोध घेतला असता तो विजापुर, राज्य कनार्टक येथे असल्याची माहिती मिळाल्याने त्यास विजापुर, कनार्टक येथून ताब्यात घेवुन त्याकडे गुन्हयाच्या अनुषंगाने चौकशी केली असता त्याने सदरचा गुन्हा हा त्याचे साथीदारासह केला असल्याचे सांगितल्याने त्यास ताब्यात घेवून पुढील तपासकामी तालुका पोलीस ठाणे, जालना येथे हजर केले. तसेच आरोपी अशोक उर्फ मुकेश उर्फ मुक्या भिकाजी तरकसे रा. कन्हैया नगर, जालना याने गुन्हे केल्याची कबुली दिली आहे.

**जाहिर प्रगटन**

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**

**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं.३०४/२०२५**
**डिगांबर किसन खंदारे विरुद्ध**
**ग्रामपंचायत कार्यालय कारेगव्हाण**

पहा

डिगांबर किसन खंदारे रा. कारेगव्हाण ता. जि. बीड

उपरोक्त प्रमाणे जन्ममृत्यु नोंद दावा प्रकरण विधिज्ञ मार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्मधारक समाधान किसन खंदारे यांचा दिनांक १५/०६/२००८ रोजी जन्म झालेला असून त्यांचे जन्माची नोंद जन्ममृत्यू नोंदवही मध्ये घेण्याबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरू आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की. सदरहून येस जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय /न.प कार्यालयस कारेगव्हाण ता. बीड येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदर होऊन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे कारेगव्हाण ता. जि. बीड येथील जन्ममृत्यू रजिस्टर ला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनाक २७/१०/२०२५ रोजी माझ्या सही शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख २७/११/२०२५ ही आहे

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार, बीड**

# शिर्डीचे रूपांतर ‘अध्यात्मिक कॉरिडॉर’ मध्ये

## पर्यटनातून रोजगार निर्मितीस प्राधान्य-पालकमंत्री विखे

शिर्डी

शहराचा वाढता विस्तार लक्षात घेवून आगामी काळात शिर्डी नगरीचे रूपांतर अध्यात्मिक कॉरिडॉरमध्ये करावे लागणार आहे. स्थानिक नागरिक आणि येणाऱ्या भाविकांसाठी अधिकच्या सुविधा निर्माण करून देतानाच, पर्यटनातून रोजगार निर्मिती हाच प्राधान्यक्रम आहे, असे प्रतिपादन पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी केले. आगामी नगरपरिषदेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मंत्री विखे पाटील यांच्या उपस्थितीत शहरातील महायुतीच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची बैठक झाली.बैठकीत निवडणुकीच्या संदर्भात स्थानिक कार्यकर्ते तसेच पदाधिकारी यांची मत जाणून घेण्यात आली. बैठकीला माजी नगराध्यक्ष कैलास कोते, अभय शेळके,शिवाजी गोंदकर,भाजपाचे राजेंद्र गोंदकर शहर अध्यक्ष रविंद्र गोंदकर,सभापती ज्ञानेश्वर गोंदकर




शिवसेनेचे विजयराव जगताप राष्ट्रवादी काँग्रेसचे बाबासाहेब कोते रमेश गोंदकर, नीलेश कोते, अलका शेजवळ, अनिल शेजवळ आदी उपस्थित होते.

मंत्री विखे म्हणाले, साईबाबांच्या नगरीत येणारी भाविकांची संख्याही वाढली.भविष्याचा विचार करून शहराचा विकास अधिक नियोजनाने करावा लागणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या माध्यमातून देशातील सर्वच अध्यात्मिक नगरीचे स्वरुप बदलत आहे. त्याच धर्तीवर शिर्डीची ओळख एक आध्यात्मिक नगरी आशी होण्यासाठी आपला प्रयत्न आहे.राज्य सरकारचे सहकार्यही यास मिळणार आहे. विविध विकास प्रकल्प कार्यान्वित करून येथील अध्यात्मिक पर्यटन वाढवण्यासाठी प्राधान्य देण्यात येणार आहे. मध्यतंरीच्या काळात शहरातील गुन्हेगारी विरोधात कठोर भूमिका घेतल्यामुळेच परीस्थिती बदलली. आध्यात्मिक नगरी अशीच ओळख शहराची राहावी, असा प्रयत्न आहे. येणाऱ्या भाविकांसाठी थीम पार्कचा प्रकल्प उद्योजकांच्या भागीदारीने कार्यान्वित करण्यासाठी राज्य सरकारने पुढाकार घेतला आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीच्या सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी अ शी एकजूट ठेवली तर मोठे यश आपलेच आहे. विधानसभा निवडणुकीत आपण सर्वानी केलेल्या चांगल्या कामामुळे ऐतिहसिक विजय मिळाला. राज्यातही महायुतीचे सरकार आले.जनतेच्या मनातील सरकार असल्याने सामान्य माणसाच्या हितासाठी निर्णय होत आहेत.एकही योजना राज्य सरकारची बंद झाली नाही. अमेरिकेने अर्थिक कोंडी करण्याचा प्रयत्न केला तरी देश आत्मनिर्भरतेने करीत असलेली वाटचाल ऑपरेशन सिंदूर मुळे जगाला दिसून आली असल्याचे मंत्री विखे म्हणाले. शासकीय प्रशिक्षण केंद्राचे रविवारी होणार उद्धाटन शिर्डी औद्यगिक वसाहतीत उद्योजक येऊ लागल्याने मोठ्या रोजगाराच्या संधी निर्माण होणार आहेत. गणेश निबे यांच्या संरक्षण विषयक उत्पादनाची सुरुवात फेब्रवारीत होणार आहे. प्रकल्प उभारणीचे काम अंतिम टप्प्यात आहे. आयटीआय प्रशिक्षण घेतलेल्या उमेदवारांना इथे संधी आहे. टाटा उद्योग समूह प्रशिक्षण केंद्र उभारत आहे.शासकीय प्रशिक्षण केंद्राचे उद्धाटन २ नोव्हेंबर रोजी मंत्री उदय सामंत यांच्या उपस्थितीत होणार असल्याची माहिती मंत्री विखे यांनी दिली.

# बीड ग्रामीण पोलिसांची हद्द वाशीपर्यंत वाढली का ?

## गुटख्याच्या कारवाईत बीड ग्रामीण पोलिसांचा सहभाग

बीड । प्रतिनिधी

बीड ग्रामीण पोलिसांना गुटखा वाहतूक करणाऱ्या गाडीची गुप्त माहिती मिळाल्यानंतर ठाण्याच्या हद्दीबाहेरच नव्हे तर थेट जिल्ह्याच्या हद्दीबाहेर जाऊन कारवाई मध्ये सहभागी होण्याचा मोठा पराक्रम करावा लागला. विशेष म्हणजे ज्या रस्त्यावर ही कारवाई झाली तो भाग वाशी पोलीस ठाण्याच्या हद्दीत तर त्या अलीकडचा भाग नेकनूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत येत असताना कारवाईत मात्र बीड ग्रामीण पोलीस सहभाग नोंदवतात या मागचे कारण मात्र लक्षात येत नाही कदाचित नेकनूर पोलीस किंवा वाशी पोलिसात सक्षम अधिकारी किंवा कर्मचारी सक्षम नाहीत काय? असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होतो .

दि.१० ऑक्टोबर २०२५ रोजी बीड सोलापूर महामार्गावर असलेल्या पारगाव शिवारात एका गुटख्याची वाहतूक करणाऱ्या पिकपवर कारवाई करण्यात आली. याप्रकरणी वाशी पोलीस ठाण्यात मुद्देमाल जमा करून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. असे असले तरी एफ. आय. आर. पाहिल्यानंतर बीड ग्रामीण पोलिसांची दक्षता लक्षात येते. बीड ग्रामीण पोलीस ठाण्याचे ए.पी.आय. बाळराजे दराडे यांना गुप्त बातमीदाराने माहिती देत एक पांढऱ्या रंगाचा पिकप ज्याचा क्रमांक एम. एच. २३ ए. यु.४७ ८३ असा असून ज्यात गुटखा असल्याची दाट शक्यता असल्याने तशा वर्णनाचा पिकअप आल्यास त्याला थांबवा अशी माहिती ए.पी.आय. बाळराजे दराडे यांनी महामार्ग पोलिसांना दिली. एवढेच नव्हे तर मी पोलीस स्टेशनचे सहकारी एन. ए. सानप यांना घेऊन येत आहे असा निरोप फोनवरच दिला. दरम्यानच्या काळात दराडे आणि सानप हे दोघेही कर्तव्यदक्ष बीड ग्रामीणचे अधिकारी आणि कर्मचारी असेलेले वरील दोघे जण पारगाव शिवारात नॅशनल हायवे क्रमांक ५२ वर हायवे पोलीस असलेल्या ठिकाणी पोहोचले आणी अगदी त्याच वेळी एक संशयित पिकप वाहन एम. एच. २३ ए. यु. ४७ ८३ हे पारगाव टोलनाक्याकडून बीड कडे येत असताना दिसले त्यामुळे त्या पिकप ला थांबवण्याचा प्रयत्न केला परंतु वाहन चालकाने पिकप न थांबवता पुढे घेऊन गेला ज्यामुळे पाठीमागून सपोनि बाळराजे दराडे व महामार्ग पोलिसांनी पाठलाग करून वाहन थांबवले व त्याला बाजूला घेण्यास सांगितले. पिकप बाजूला घेतल्यानंतर पिकप च्या हावद्यात तपासले असता निळ्या व गुलाबी रंगाच्या पिशव्यांमध्ये गुटका मसाला आढळून आला. हा सर्व मजकूर एफ.आय.आर.मध्ये नोंद करण्यात आला आहे.गुटखा पकडला याबद्दल पोलिसांचे अभिनंदनच परंतु बीड ग्रामीणचे पोलीस ठाण्याच्या हद्दीच्याच नव्हे तर जिल्ह्याच्या हद्दीबाहेरही कारवाया किंवा कारवायांमध्ये सहभागी होतात हे कायदेशीर दृष्ट्या योग्य आहे की नाही हे मात्र समजत नाही एरवी हद्दीमुळे गुन्हा दाखल करून न घेणारे पोलीस थेट शेजारच्या जिल्ह्यात जातात आणि कामगिरी बजावतात तेव्हा काय म्हणावे.

### एल. सी. बी. ला कळवले का नाही

बीड ग्रामीण पोलिसांना गुटखा वाहतूक करणाऱ्या वाहनाची गुप्त माहिती मिळाल्यानंतर याची माहिती स्थानिक गुन्हा शाखेच्या पोलिसांना का दिली गेली नाही दिली असेल तर एलसीबी चे कर्मचारी कारवाईसाठी का गेले नाहीत हा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होतो



बीड : दैनिक राज्य लोकतंत्र दीपोत्सव २०२५ अंक तहसीलदार चंद्रकांत शेळके यांना देताना कार्यकारी संपादक सुभाष चौरे पत्रकार रवी उबाळे व महसूल कर्मचारी

## धनवडे वस्ती लगत उभारण्यात येणाऱ्या साईबाबा मंदिरासाठी लोकसहभागाचे आवाहन

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी शहरात श्रद्धा व भक्तीचे प्रतीक ठरणारे साईबाबा मंदिर उभारण्याचे कार्य साई भक्त मंडळ, आष्टी यांच्या पुढाकाराने सुरू करण्यात आले असून या उपक्रमात शहरातील नागरिक, व्यापारी व दानशूर व्यक्तींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा, असे आवाहन साई बाबा भक्त मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

आष्टी शहरातील धनवडे वस्ती रोडवर हे भव्य दिव्य मंदिर उभारले जाणार असून यात आकर्षक साई बाबांची मूर्ती, गाभारा, ध्यानकक्ष, तसेच सभागृह याचा समावेश असेल. या मंदिरासाठी मोठ्या प्रमाणावर निधी लागणार असल्याने त्यासाठी श्री साई भक्तांनी पुढाकार घेऊन आर्थिक किंवा वस्तुरूपी मदत करण्याचे आवाहन यावेळी साई भक्तांनी केले आहे.या मंदिराच्या कामाचे भूमिपूजन गुरुवार दिनांक ३० ऑक्टोबर रोजी संपन्न झाले.

यावेळी प्रतिक्रिया व्यक्त करतान साई भक्त मंडळाचे सदस्य म्हणाले की, ''हे मंदिर केवळ पूजेसाठी ◀◀ पान २ वर

## बस स्थानक परिसरातून ६० हजार रुपये चोरणाऱ्या चोरट्यास अटक

बीड । प्रतिनिधी

दिनांक २७आऑक्टोबर रोजी दुपारी २ वाजता बीड बस स्थानक येथे बाळकृष्ण भाऊराव सरवदे वय ४८ वर्षे रा. गवळवाडी ता.जि.बीड हे बीड बस स्थानक येथुन छत्रपती संभाजीनगर येथे जाणेसाठी बस मध्ये चढत असतांना त्यांचे पॅन्टचे खिशातुन रोख रक्कम ६०,०००/- रु. कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरी करुन ◀◀ पान २ वर



## कर्जमाफी व शेतकऱ्यांच्या प्रश्नाबाबत आंदोलनास वडवणीतील शेतकऱ्यांचा पाठिंबा

**वडवणी । प्रतिनिधी**

शेतकऱ्यांचा प्रश्नाला घेऊन चालू असलेल्या आंदोलन ज्याचे नेतृत्व अखिल भारतीय किसान सभेचे राज्य सचिव डॉ.अजित नवले, प्रहार संघटनेचे नेते बच्चुभाऊ कडू, शेतकरी संघटनेचे राजू शेट्टी, रविकांत तुपकर,महादेव जानकर यासह इतर शेतकरी नेते करत आहेत. सदर आंदोलन शेतकऱ्यांच्या न्याय मागण्यासाठी संविधानिक मार्गाने चालू असताना सरकारने कपटनीतीचा वापर करून हे आंदोलन मोडीत काढण्याचे प्रयत्न केले. हे



आंदोलन शेतकऱ्यांच्या रास्त मागण्यांना घेऊन चालू असल्यामुळे अखिल भारतीय किसान सभा वडवणी तालुका व शेतकऱ्यांच्या वतीने या आंदोलनाला जाहीर पाठिंबा तहसीलदार यांच्यामार्फत महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री यांना पाठवण्यात आलेल्या निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. या निवेदनाद्वारे १. सरसकट शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करा. २. अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी जाहीर केलेली मदत भरीव व विना अडथळा शेतकऱ्यांना तात्काळ वाटप करा. ३. उत्पादन खर्च अधिक ५० टक्के नफा गृहीत धरून रास्त हमीभाव शेतकऱ्यांच्या पदरात पाडून देण्याची व्यवस्था निर्माण करा. ४. सोयाबीन,कापूस शासकीय खरेदी केंद्र तात्काळ चालू करा ५. विद्यार्थ्यांची संपूर्ण शैक्षणिक शुल्क माफी करण्यात यावी. ६. विद्यार्थ्यांना मोफत बस पास व रेल्वे पास देण्यात यावा या व अन्य मागण्या करण्यात आल्या.

## स्पोर्ट बाईकचा वापर करून महिलांच्या गळ्यातील चैन हिसकावून घेणाऱ्या दोन अट्टल गुन्हेगारास अटक

बीड । प्रतिनिधी

पोलीस अधीक्षकांनी बीड जिल्ह्यातील चोरी, घरफोडी, जबरी चोरी व दरोडा इत्यादी मालमत्ते विरूध्द दाखल गुन्हे उघड करण्याचे आदेश स्थानिक गुन्हे शाखेला दिलेले आहेत.

पोस्टे माजलगाव शहर गुरन. ३८३/२०२५ कलम ३०४ (२) भारतीय न्याय संहिता,पोस्टे परळी शहर गुरन. २७४/२०२५ कलम ३०४,३ (५) भारतीय न्याय संहिता प्रमाणे दाखल गुन्ह्यातील आरोपीचा शोध पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड स्थानिक गुन्हे



शाखा बीड यांच्या आदेशाने पोउपनि सुशांत सुतळे, पोह. १४६८ मारूती कांबळे, १४२९ रामचंद्र केकान, ९८९ विष्णु सानप, १९१८ गोविंद भताने, पोअ १०५५ सचिन आंधळे असे, प्राप्त फुटेज, डम व इतर तांत्रीक गोष्टीचा वापर करून घेत असतांना त्यांना गोपनिय बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, माजलगाव येथील गुन्ह्यातील संशयीत दोन्ही आरोपी हे चोरी केलेले सोने विक्री करण्यासाठी नविन थर्मल कॉलनी परळी येथे येणार आहेत.

मिळालेल्या बातमीच्या आधारे दि.३०.१०.२०२५ रोजी पथकाने सापळा रचुन, नविन थर्मल कॉलनी परळी येथे थांबुन आरोपीची माहिती घेवुन स्पोर्ट बाईकवर आलेल्या दोन इसमास शिताफीने ताब्यात घेवुन, त्याचे नाव गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नावे १) गुलामरज्जा मजलुम सय्यद वय २६ वर्षे २) मुस्लीम नासेर बेग वय ४३ वर्षे दोन्ही रा.लोणी ◀◀ पान २ वर

## 'रन-वॉक फॉर युनिटी' एकतेसाठी धावले जिल्ह्यातील पोलीस व नागरिक!

बीड । प्रतिनिधी

पोलीस अधीक्षक श्री.नवनीत काँवत यांचे मार्गदर्शनात बीड शहर व जिल्हयातील पोलीस स्टेशन येथे लोहपुरुष, एकात्मतेचे शिल्पकार सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षीप्रमाणे ''रन फॉर युनिटी'' ''वाक फॉर युनिटी'' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

जनतेमध्ये एकतेचा, राष्ट्रीय ऐक्याचा आणि सामाजिक सलोख्याचा संदेश देण्यासाठी, देशाच्या विकासासाठी आणि समाजातील सर्व घटकांमध्ये



ऐक्याचे बंध अधिक दृढ व्हावेत, या हेतूने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये पोलिसांबरोबर नागरिकांनी सहभागी होवून उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदविला. यावेळी बीड शहरात तसेच जिल्हयातील इतर पोलीस स्टेशन स्तरावर ◀◀ पान २ वर

## यशराज पंडित, शिवराज पवारांच्या उपस्थितीत सरदार वल्लभभाई पटेल जयंतीनिमित्त एकता दौड



गेवराई । प्रतिनिधी

स्वतंत्र भारताचे पहिले गृहमंत्री, लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, लोकनेत्या ना पंकजाताई मुंडे, माजी खा प्रीतमताई मुंडे यांच्या नेतृत्वाखाली युवानेते यशराज पंडित आणि युवानेते शिवराज पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत पदाधिकाऱ्यांनी गेवराई शहरात ◀◀ पान २ वर

## तळेगावमधील वेश्या व्यवसायावर मानवी वहातूक शाखेचा छापा

### दोन पिडीत महिलांची सुटका, गुन्हा दाखल

बीड । प्रतिनिधी

नैतिक वाहतूक प्रतिबंध कक्ष बीडच्या पोलीस उप निरीक्षक पल्लवी जाधव यांना दिनांक ३०/१०/२०२५ रोजी दुपारी गुप्त बातमीदारामार्फत माहीती मिळाली की , पोलीस ठाणे बीड ग्रामीण हद्दीत तळेगाव येथे एका पत्र्याच्या शेड मधे दोन महिलांना बाहेर जिल्ह्यातून बोलावून, वेश्या व्यवसाय करीत आहेत. ही माहिती वरिष्ठांना देण्यात आली. त्यावरून वरिष्ठांनी पोलीस निरीक्षक उमाशंकर कस्तुरे यांना सदर ठिकाणी छापा टाकण्याचे लेखी आदेश दिले. त्यावरून कस्तुरे व अ. मा. वा. प्र. कक्षाच्या प्रमुख पल्लवी जाधव या त्यांच्या संपूर्ण



स्टाफसह तसेच डमी ग्राहक व पंचासह सापळापूर्व पंचनामा करून सदर ठिकाणी गेले. डमी ग्राहकास सदर ठिकाणी पाठवून खात्री केली असता तेथे असलेल्या महिला एजंटने वेश्या गमनासाठी होकार देवून त्यासाठी १००० रुपयांची मागणी केली. डमी ग्राहकाने ठरल्या प्रमाणे रक्कम देवून पोलीस पथकास ठरलेला इशारा केला असता, पोलीस पथकाने सदर ठिकाणी छापा मारला. पैसे स्वीकारलेल्या महिलेला तिचे नाव गाव विचारले असता, तिने तिचे नाव माया अरुण कांबळे (वय ३८ वर्षे रा.महाकुंडे वसती, तळेगाव ता.जि बीड) असे सांगितले. सदर महिलेची झडती घेतली असता डमी ◀◀ पान २ वर

## शेतकऱ्याच्या चेहऱ्यावरचं हसू हाच आमचा दिवाळीचा आनंद- तहसीलदार शेळके

बीड । प्रतिनिधी

शुक्रवार दि ३१ ऑक्टोबर रोजी पांढऱ्याचीवाडी (ता. बीड) येथील सभागृह वेगळ्याच वातावरणाने भरून गेल होत . प्रशासन आणि शेतकरी वर्गाचा थेट संवाद या भावनेने , समजुतीने आणि जबाबदारीने सजलेला . बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी येळंबघाट मंडळातील शेतकऱ्यांशी संवाद साधत अनुदान, नुकसानभरपाई , शेतीतील समस्या आणि शासनाच्या योजनांबाबत सविस्तर मार्गदर्शन केले .

या संवाद सत्रात नांदूर फाटा , धावज्याचीवाडी , खरड्याचीवाडी , चाकरवाडी या गावांतील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते . तहसीलदार शेळके यांनी प्रत्येक शेतकऱ्याचे प्रश्न संयमाने ऐकून घेतले , त्यांच्या अडचणींचे तत्काळ निराकरण करण्याचे आश्वासन दिले .



त्यांनी सांगितले की यंदा झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. मुख्यमंत्री महोदय , पालकमंत्री अजितदादा पवार यांचे स्पष्ट निर्देश होते की, शेतकऱ्यांच्या खात्यातील अनुदान दिवाळीपूर्वी जमा व्हावे .त्यानुसार बीड प्रशासनाने त्यासाठी सर्व यंत्रणा सज्ज ठेवली होती. शेळके पुढे म्हणाले की तुमच्या भागातील सुमारे ९० टक्के शेतकऱ्यांच्या खात्यात अनुदान जमा झाले आहे . उर्वरित शेतकऱ्यांनी त्वरित फार्मर आयडी तयार करावेत. तहसीलदार शेळके यांनी यानंतर 'आपले सरकार केंद्र' येथे पाहणी केली . नंतर थेट शेतकऱ्यांच्या शेतात जाऊन सहाय्यक स्तरावरील पीक पाहणीचे प्रात्यक्षिक दाखवले . शेतीबरोबरच आपल्या मुलांना चांगले शिक्षण द्या , शासनाच्या योजना समजून घ्या आणि गावातील समस्या थेट आमच्यापर्यंत पोहचवा प्रशासन सदैव तुमच्या सेवेसाठी तयार आहे, असे त्यांनी सांगितले. सभागृहात शेतकऱ्यांनीही त्यांना प्रश्न विचारले , काहींनी अनुदान मिळाल्याची माहिती दिली . चेहऱ्यावर आनंदाचे हास्य घेऊन शेतकऱ्यांनी शासन आणि प्रशासनाचे आभार मानले. यावेळी उपस्थित शेतकऱ्यांनी आपल्याला अनुदान मिळाले असल्याचे सांगून समाधान व्यक्त केले व याबद्दल शासनाचे , जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन , उपविभागीय अधिकारी कविता जाधव , तहसीलदार चंद्रकांत शेळके यांचे व सर्व कनिष्ठ अधिकारी , कर्मचारी यांचे आभार मानले. यावेळी मंडळ अधिकारी दीपाली आघाव, ग्राम महसूल अधिकारी प्रदीप गर्जे , प्रशांत ◀◀ पान २ वर




This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...

पुणे विशेष

शनिवार दि.१ नोव्हेंबर २०२५ | पान ७

# मी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा राजीनामा देते, रुपाली ठोंबरेंचं मोठं वक्तव्य



**पुणे | प्रतिनिधी**

**राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या नेत्या रुपाली ठोंबरे यांनी मोठं वक्तव्य केलं आहे. मी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा राजीनामा देते असं वक्तव्य त्यांनी केलं आहे. पुढच्या १ मिनिटात ट्विट करुन राजीनामा देते असंही त्या म्हणाल्या आहेत. राजीनामा दिल्यानंतर पोलीस आणि हे सरकार कसं काम करतं हे सगळ्यांच्या समोर आणणार असल्याची माहिती त्यांनी दिली आहे. महिला आयोगा प्रमाणेच पोलीस देखील काम करायला लागले आहेत, असे रुपाली ठोंबरे म्हणाल्या.**

रुपाली ठोंबरे या खडक पोलीस स्टेशनमध्ये पोहोचल्या आहेत. पोलीस वरिष्ठ निरीक्षक शशिकांत चव्हाण यांच्या दालनामध्ये रुपाली ठोंबरे बातचीत करत आहेत. यावेळी त्यांनी पोलीस वरिष्ठ निरीक्षक शशिकांत चव्हाण यांच्या दालनामध्ये ठिय्या मांडल्याचे पाहायला मिळाले. मला अटक करा असेही त्या म्हणाल्या. रूपाली ठोंबरे पाटील यांच्या बहिणीसह चार जणांविरुद्ध खडक पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल झाला आहे. माधवी खंडाळकर यांनी खडक पोलीस स्टेशनमध्ये येऊन तक्रार दिल्यानंतर हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रुपाली पाटील खडक पोलीस स्टेशनमध्ये दाखल होत पोलिसांना जाब विचारत आहेत. गुन्हा कसा दाखल केला? असा सवाल रुपाली ठोंबरे यांनी केला आहे. पुण्यामध्ये नसतानाही रुपाली ठोंबरे यांच्यावरती गुन्हा दाखल केल्याने त्या आक्रमक झाल्या आहेत. पोलिसांवर राजकीय दबाव असल्याने माझ्यावर चिखल उडवण्यात आला आहे असा आरोप रुपाली ठोंबरे पाटील यांनी केला आहे. अजूनही रुपाली ठोंबरे पाटील पुण्यातील खडक पोलीस स्टेशनमध्ये बसून आहेत. त्यांची सध्या वरिष्ठ पोलिसांची चर्चा सुरु आहे.पुण्यातील माधवी खंडाळकर या महिलेने फेसबुक लाईव्ह करुन रुपाली ठोंबरे यांच्यावर गंभीर आरोप केल्यानंतर हा वाद अधिकच टोकाला केल्याचं दिसून येतं. रुपाली ठोंबरे पाटील यांनी गुंड पाठवून मारहाण करण्यात आल्याचा दावा एका महिलेने केला होता, याबाबतचा व्हिडिओ मोठ्या प्रमाणावर सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. गुंड पाठवून अमानुषपणे मारहाण केल्याचा आरोप या महिलेने केला होता. मारहाणीनंतर ही महिला रक्तबंबाळ झाल्याचं व्हिडीओमध्ये दिसून येत होतं. रूपाली ठोंबरे पाटील यांच्या विरोधात पोस्ट केल्याने मारहाण केल्याचा आरोप त्या महिलेने केला होता. माधवी खंडाळकर असं या महिलेचं नाव आहे.

# शेअर बाजारात गुंतवणुकीच्या आमिषाने ८४ लाखांची फसवणूक

पुणे | प्रतिनिधी

शेअर बाजारात गुंतवणुकीच्या आमिषाने सायबर चोरट्यांनी वेगवेगळ्या घटनेत नागरिकांची ८४ लाख रुपयांची फसवणूक केल्याचे समोर आले आहे. याप्रकरणी चोरट्यांविरुद्ध पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत.

शेअर बाजारात गुंतवणुकीच्या आमिषाने सिंहगड रस्ता भागातील एका ज्येष्ठ नागरिकाची सायबर चोरट्यांनी ३३ लाख १९ हजार रुपयांची आर्थिक फसवणूक केली. याप्रकरणी चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. याबाबत ज्येष्ठ नागरिकाने सिंहगड रस्ता पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी ६६ वर्षीय ज्येष्ठ नागरिक हे सिंहगड रस्त्यावरील माणिकबाग परिसरात राहायला आहेत. सायबर चोरट्यांनी त्यांच्या मोबाइल क्रमांकावर शेअर बाजारातील गुंतवणुकीबाबत १५ जुलैरोजी मेसेज पाठविला होता.

चोरट्यांनी त्यांना गुंतवणुकीवर चांगला परतावा देण्याचे आमिष दाखवून जाळ्यात ओढले. त्यानंतर चोरट्यांच्या खात्यात ज्येष्ठ नागरिकाने वेळोवेळी ३३ लाख १९ हजार रुपये जमा केले. पैसे जमा केल्यानंतर



चोरट्यांनी त्यांना परतावा दिला नाही. परतावा न मिळाल्याने ज्येष्ठाने चोरट्यांच्या मोबाइल क्रमांकावर संपर्क साधला. तेव्हा चोरट्यांनी प्रतिसाद दिला नाही. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी पोलिसांकडे तक्रार दिली. गुन्हे पोलिस निरीक्षक उल्हास कदम तपास करत आहेत.

तर वाघोली भागातील एका तरुणाची शेअर बाजारात गुंतवणुकीच्या प्रलोभनाने २४ लाख ८१ हजार रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याबाबत एका तरुणाने वाघोली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्याने दिलेल्या फिर्यादीनुसार, चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वरिष्ठ पोलिस निरीक्षक युवराज हांडे तपास करत आहेत. अशाच पद्धतीने बिबवेवाडी भागातील एका महिलेची सायबर चोरट्यांनी दहा लाख ८९ हजार रुपयांची फसवणूक केली. याबाबत एका ४१ वर्षीय महिलेने बिबवेवाडी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली असून, गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक सूरज बेंद्रे तपास करत आहेत.कोंढवा भागातील एका तरुणाची सायबर ठगांनी शेअर बाजारात गुंतवणुकीच्या आमिषाने दहा लाख ९८ हजार रुपयांची फसवणूक केली. याबाबत तरुणाने कोंढवा पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक नवनाथ जगताप तपास करत आहेत.

# मंत्री केसरकर आता 'आर्य'चा जीव परत आणू शकतात का? प्रशासन गेंड्याच्या कातडीचं, कोल्हेंचा हल्लाबोल

पुणे | प्रतिनिधी

मुंबईतील पवई भागात काल घडलेल्या घटनेनं राज्य हादरलं. रोहित आर्यने आपली मागणी मान्य करण्यासाठी लहान मुलांना ओलीस ठेवलं होतं, त्या मुलांची सुटका करताना पोलिसांकडून त्याचं इन्काऊंटर झालं. या निमित्ताने अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. या प्रकरणी अनेक आरोप प्रत्यारोप केले जात आहेत.

याबाबत बोलताना राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे खासदार अमोल कोल्हे म्हणाले, घडलेली घटना ही दुर्दैवी आहे, रोहित आर्य याने जो काही मार्ग निवडला त्या मार्गाचा समर्थन होऊ शकत नाही. परंतु राज्यातील देशातील नागरिकाला अशा पद्धतीने आपली मागणी त्यांच्यापर्यंत पोहोचवण्याची वेळ का येते, याचा अंतर्मुख होऊन



विचार करणे गरजेचे आहे. यापूर्वीसुद्धा त्यांनी दोन वेळा उपोषण केलं होतं. ज्या खात्याच्या संदर्भात त्यांचा विषय होता त्या मंत्री महोदयांनी त्यांची भेट घेऊन याबाबत आश्वासन देखील दिलं होतं. तरीही विषय सुटत नव्हता. त्यानंतर देखील इतक्या गेंड्याच्या कातडीच्या शासन आणि प्रशासन काम करत असेल तर या प्रशासनाचे प्रमुख म्हणून शासनाच्या प्रमुख म्हणून देवेंद्र फडणवीस जेव्हा महाराजांच्या समोर नतमस्तक होण्याचे होर्डिंग्स लावतात, तेव्हा पुन्हा तोच प्रश्न येतो रयतेच्या भाजीच्या देठाला हात लागू देऊ नका अशी छत्रपतींची शिकवण एकीकडे आणि दुसरीकडे आपली मागणी त्यांच्या मते न्याय मागणी मांडण्यासाठी अशा पद्धतीचा अवलंब करावा लागावा त्या घटनेमध्ये त्या व्यक्तीला आपला जीव गमवावा लागतो हे घटना अत्यंत दुर्दैव आहे,असंही अमोल कोल्हे यांनी म्हटलं आहे.

## विघ्नहर साखर कारखान्याच्या ४०व्या गळीत हंगामाचा शुभारंभ अजित पवार यांच्या हस्ते

**नारायणगाव | प्रतिनिधी**

**विघ्नहर सहकारी साखर कारखान्याच्या ४० व्या गळीत हंगामाच्या शुभारंभासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार येणार असल्याची खात्रीलायक माहिती आहे. दि. ३ नोव्हेंबर रोजी गळीत हंगामाचा शुभारंभ होणार आहे. मागील हंगामाचा शुभारंभ राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांच्या हस्ते करण्यात आला होता.**


विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष सत्यशील शेरकर यांनी विधानसभेची निवडणूक राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार या पक्षाकडून लढवली होती. विधानसभा निवडणुकीमध्ये शेरकर यांचा पराभव झाला होता. निवडणुकीनंतर शेरकर स्वतः अजित पवार यांना मुंबई येथे भेटायला गेले होते.उपमुख्यमंत्री झाले म्हणून त्यांचे शेरकर यांनी अभिनंदन केले होते. सध्या राज्यातील सहकारी साखर कारखानदारी आर्थिक अडचणीत असल्यामुळे राज्य सरकारचा पाठिंबा असावा, यासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते या हंगामाचा शुभारंभ करण्यात येणार असल्याचे समजते. 'विघ्नहर'चे अध्यक्ष शेरकर यांनी विधानसभा निवडणुकीनंतर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या एकाही जाहीर कार्यक्रमाला हजेरी लावलेली नाही. त्यामुळे सध्या सत्यशील शेरकर शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसवर नाराज तर नाहीत ना? अशीही चर्चा जुन्नर तालुक्यात रंगू लागली आहे.

# वकील संरक्षण कायद्याची मागणी.! सोमवारी वकील न्यायालयीन कामकाजापासून राहणार अलिप्त

पुणे | प्रतिनिधी

वकील संरक्षण कायद्याच्या मागणीसाठी शिवाजीनगर न्यायालयासह जिल्ह्यातील सर्व न्यायालयात सोमवारी (दि. ३ नोव्हेंबर) वकील कामापासून अलिप्त राहणार आहेत. राज्यातील वकिलांची शिखर संघटना असलेल्या बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवाच्या वतीने २९ ऑक्टोबर रोजी ठराव करून राज्यातील वकिलांना ३ नोव्हेंबर रोजी कामापासून अलिप्त राहण्याचे आवाहन केले आहे.

या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे. याविषयी पुणे बार असोसिएसशनचे अध्यक्ष ॲड. हेमंत झंजाड म्हणाले




की, अलिकडच्या काळात वकिलांना होणारी मारहाण, होणारे हल्ले, घडणाऱ्या घटना पाहता वकील संरक्षण कायदा होणे गरजेचे आहे. त्यामुळे बार कौन्सिलच्या आवाहनुसार शहर व जिल्ह्यातील वकिलांनी एक दिवस कामकाजापासून अलिप्त राहण्याचे आवाहन केले आहे.कौटुंबिक न्यायालयातील वकिलांची संघटना असलेली द पुणे फॅमिली कोर्ट लॉयर्स असोसिएशननेही बार कौन्सिलच्या ठरावाला पाठिंबा दिला आहे. कौटुंबिक न्यायालयात वकिलांनी एक दिवस कामकाजापासून अलिप्त राहण्याचे आवाहान अध्यक्ष ॲड. कल्पना निकम यांनी केले आहे.

# पाण्याच्या टाकीत बुडून 'वरमाई'चा मृत्यू, गवळी कुटुंबावर शोककळा

पिंपरी | प्रतिनिधी

अवघ्या तीन दिवसांवर मुलाचे लग्न... दारावर तोरणे झळकत होती, स्वयंपाकघरात लग्नाच्या जेवणाचा सुगंध दरवळत होता आणि घरात पाहुण्यांच्या हसऱ्या गप्पांचा गजबजाट होता. मात्र, नियतीच्या मनात काही वेगळंच लिहिल होते. लग्नाच्या तयारीत सुरू असलेल्या धावपळीतच पाण्याच्या टाकीत पडून वरमाई म्हणजेच नवऱ्या मुलाच्या आईचा मृत्यू झाला. आनंदात न्हाऊन निघालेले गवळी कुटुंब एका क्षणात शोकसागरात बुडाले. चिंचवड येथील मोहननगर परिसरात शुक्रवारी (दि. ३१) सकाळी ही हृदयद्रावक घटना घडली. आशा संजय गवळी (५२, रा. मोहननगर, चिंचवड) असे मृत्यू झालेल्या वरमाईचे नाव आहे.

आशा गवळी या गृहिणी होत्या. तर त्यांचे पती पुण्यातील शाळेत कर्मचारी आहेत. मूळ इंदापूर तालुक्यातील असलेल्या गवळी दांपत्याने दोन्ही मुलांना इंजिनिअर बनवण्यासाठी आयुष्यभर झगडत



संसार उभा केला. मोठा मुलगा संसारात स्थिरावला असून त्याला एक मुलगाही आहे. धाकट्या मुलाचे लग्न येत्या ४ नोव्हेंबर रोजी कोल्हापूर येथे होणार होते, तर ३ नोव्हेंबरला साखरपुडा ठरला होता. घरात धार्मिक विधी सुरू होते; पाहुण्यांची ये-जा, खरेदी, कपडे-दागिन्यांची तयारी यामुळे वातावरण उत्साहाने भारलेले होते.

दरम्यान, शुक्रवारी देवीचा वार असल्याने घरात 'सुवासिनींचे जेवण' ठेवण्यात आले होते. स्वयंपाकाची लगबग सुरू असतानाच पाण्याची टंचाई जाणवली. त्यामुळे वरमाई आशा गवळी या पाण्याची बादली भरायला टाकीजवळ गेल्या. झाकण उघडून बादली टाकताना त्यांचा तोल गेला आणि त्या टाकीत पडल्या. काही वेळानंतर नवऱ्या मुलाला आई दिसत नसल्याने त्याने शोध घेण्यास सुरुवात केली. टाकीचे झाकण उघडे दिसल्याने मनात शंका आली. आत डोकावल्यावर समोर आईचे निष्प्राण शरीर दिसले. हे दृश्य पाहताच बोहल्यावर चढण्यासाठी सज्ज झालेल्या मुलाने अक्षरशः टाहो फोडला. आई... उठ ना... माझं लग्न आहे... असा हंबरडा फोडत तो खाली बसला. शेजाऱ्यांनी धाव घेत आशाताईंना बाहेर काढले. त्यांना तात्काळ रुग्णालयात नेण्यात आले; मात्र, डॉक्टरांनी तपासणीअंती त्यांना मृत घोषित केले.या घटनेची बातमी पसरताच मोहननगर परिसर शोकमग्न झाला. आयुष्यभर ज्यांनी मुलांच्या भवितव्यासाठी संसाराची प्रत्येक वीट रचली, त्या आईला आपल्या मुलाच्या कपाळावर मुंडावळ्या बांधलेला पाहायचाही योग आला नाही. लग्नघरातील सजावट उतरवण्यात आली, दिव्यांचा प्रकाश मंदावला आणि रडण्याचे हुंदके अंगणभर घुमू लागले.

## 'समाजाच्या भावनांना न्याय मिळाला'-पाटील

पुणे | प्रतिनिधी

जैन हॉस्टेलबाबतचा व्यवहार रद्द करण्याचा आदेश धर्मादाय आयुक्तांनी दिल्यामुळे जैन समाजाच्या भावनांना न्याय मिळाल्याचे मत उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी व्यक्त केले. ते म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जैन समाजाला न्याय देण्याची भुमिका घेतली होती. विकसकाने व्यवहार रद्द करण्यासाठी केलेला अर्ज, त्यानंतर ट्रस्टने व्यवहारातून बाहेर पडण्याचा घेतलेला निर्णय आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जैन समाजाला दिलेली ग्वाही या पार्श्वभूमीवर धर्मादाय आयुक्तांनी सामाजिक सलोखा जपणारी भूमिका घेत परस्परमान्यतेने हा व्यवहार रद्द करण्याचे आदेश दिले.

या निर्णयामुळेजैन मुनींचाही सन्मानपूर्वक आदर करण्यात आला आहे. याविषयी जैन समाजाने घेतलेल्या सामजंस्यपूर्वक भूमिकेबद्दल त्यांचे आभार.भारतीय जनता पक्षावर समाजाच्या असलेल्या विश्वासाला तडा जाणार नाही, याची काळजी आम्ही सतत घेत असतो. आता या प्रकरणी सुरू असलेली चिखलफेक थांबवावी. पुण्यातले वातावरण आणखी गढूळ करू नये, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

# काही पोलीस राजकीय दबावाखाली काम करत आहेत - रोहित पवार

पुणे | प्रतिनिधी

महाराष्ट्रात दररोज खून, बलात्कार आणि गुंडगिरीच्या घटना वाढत आहेत. शेतकऱ्यांचे प्रश्न गंभीर असूनही राज्य सरकार त्याकडे दुर्लक्ष करत आहे. मात्र, सरकारला भाजपच्या ट्रोलरना पुढे करून आमच्याविरुद्ध गुन्हे दाखल करण्यास वेळ आहे. आमचा आवाज दाबण्यासाठी चुकीची कलमे लावून खोटे गुन्हे दाखल केले जात आहेत. तुम्हाला कितीही गुन्हे दाखल करायचे असतील ते करा, पण आम्ही घाबरणार नाही आणि सरकारविरुद्ध बोलतच राहू, अशा शब्दांत आमदार रोहित पवार यांनी राज्य सरकारवर जोरदार टीका केली.



कर्जत-जामखेड मतदारसंघात आधारकार्डचा गैरवापर करून मतदार याद्यांमध्ये फेरफार झाल्याचा आरोप करत पवार यांनी काही दिवसांपूर्वी पत्रकार परिषदेत प्रात्यक्षिक दाखविले होते. त्यानंतर गृहविभागाने त्यांच्या विरोधात सायबर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला. या प्रकरणानंतर गुरुवारी पवार यांनी पुन्हा पत्रकार परिषद घेऊन भाजप आणि राज्य सरकारवर टीकेची झोड उठवली.

अंधश्रद्धेविरुद्ध एखादे प्रात्यक्षिक दाखवून त्यातील खोटेपणा उघड करतो, त्याप्रमाणे मी आधारकार्डचा गैरवापर दाखविला. मात्र, त्या प्रकाराची दखल घेण्याऐवजी माझ्याविरुद्धच गुन्हा दाखल केला गेला. या प्रकरणात तपास गृहविभागाने केला असला तरी फिर्यादी मात्र भाजपच्या सोशल मीडियावरील कार्यकर्ता आहे, असे पवार यांनी सांगितले.

# मिनी मॅरेथॉन स्पर्धेत आदीत्य वारूळे व सायली बिबवे प्रथम

**नारायणगाव | प्रतिनिधी**

**सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्ताने 'राष्ट्रीय एकता दिवस' अभियानांतर्गत नारायणगाव पोलिस ठाण्याच्या वतीने दोन किलोमीटर अंतराच्या मिनी मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन केले होते. दोन गटात घेण्यात आलेल्या या स्पर्धेत आदित्य वारुळे (मुले गट), सायली बिबवे (मुली गट) यांनी प्रथम क्रमांक पटकाविला, अशी माहिती नारायणगाव पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक प्रवीण सपांगे यांनी दिली.**

येथील बस स्थानक आवारात झालेल्या कार्यक्रमात स्पर्धेचे उद्घाटन नारायणगाव पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक



प्रवीण सपांगे यांच्या हस्ते झाले. यावेळी पोलिस निरीक्षक जगदेव पाटील, डॉ. अनुष्का शिंदे, सुधाकर लोंढे आदी उपस्थित होते. दोन गटात घेण्यात आलेल्या या स्पर्धेत सहा वर्ष वयोगटातील मुलांपासून ७० वर्षाच्या ज्येष्ठ नागरिकांनी सहभाग नोंदवला. या स्पर्धेत सुमारे दोनशे स्पर्धकांनी भाग घेतला.

स्पर्धेचे नियोजन हवालदार दत्ता ठोंबरे, मंगेश लोखंडे यांच्या मार्गदर्शनाखाली राजे करिअर कॅडमी नारायणगाव, शिवनेर फाउंडेशन, राजे शिवछत्रपती प्रतिष्ठान, क्रीडा शिक्षक दादू कोठाळे, प्रथमेश वाणी, मुकेश वाजगे, गणेश रोमन यांनी केले. सहभागी सर्व स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात आली. प्रथम तीन क्रमांकात आलेल्या खेळाडूंना ट्रॉफी, प्रशस्तीपत्रक व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित केले. राष्ट्रीय एकता दिवस शपथ घेऊन कार्यक्रमाची सांगता केली.



## 'चैतन्य' वार्षिक अंकाचे अजित पवारांच्या हस्ते प्रकाशन

ओतूर - पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या (पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शिक्षण संस्था) अण्णासाहेब वाघिरे महाविद्यालय, ओतूर यांच्या चैतन्य या वार्षिक अंकाचे (सन २०२४-२५) प्रकाशन महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री व पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे अध्यक्ष अजित पवार यांच्या हस्ते करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य व अंकाचे कार्यकारी संपादक डॉ. महेंद्र अवघडे आणि मुख्य संपादक डॉ. राजेश रसाळ यांनी ही माहिती दिली.

महाविद्यालयीन जीवनात विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी वार्षिक अंक महत्त्वाची भूमिका बजावत असतो. चैतन्य या नियतकालिकातून वर्षभरात राबवलेले विविध उपक्रम, कार्यक्रमांचे अहवाल, विद्यार्थ्यांचा गुणगौरव, कथा, कविता, लेख, एन.एस.एस., एन.सी.सी. तसेच विविध विभागांचे अहवाल प्रतिबिंबित झाले आहेत. अंकाचे मुखपृष्ठ लक्षवेधक असून, मलपृष्ठ महाविद्यालयाचे वैभव अधोरेखित करते. प्रकाशन कार्यक्रमासाठी संस्थेचे उपाध्यक्ष राजेंद्र घाडगे, मानद सचिव अड. संदीप कदम, खजिनदार अड. मोहनराव देशमुख यांसह नियतकालिकाच्या संपादक मंडळातील सदस्य उपस्थित होते.

# शिरूरमध्ये 'रन फॉर युनिटी' अंतर्गत राष्ट्रीय एकता दौड उत्साहात पार



शिरूर - शिरूर पोलीस ठाण्याच्या वतीने दि. ३१ सकाळी ७ वाजता 'रन फॉर युनिटी' अंतर्गत राष्ट्रीय एकता दौड चे भव्य आयोजन करण्यात आले. लौहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त आयोजित या दौडीस स्थानिक नागरिक, विद्यार्थी व पोलीस कर्मचारी यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या एकता दौडीत शिरूर पोलीस ठाण्याचे अधिकारी, ६ पोलीस अधिकारी, ४० पोलीस अंमलदार तसेच सीताबाई थिटे कॉलेज आणि श्रीनाथ कॅडमी येथील विद्यार्थ्यांसह नागरिक मिळून सुमारे १९० ते २०० सहभागी झाले होते.

दौड सीताबाई थिटे कॉलेज येथून सुरू होऊन बाबुराव नगर ब्रिज - सिटी बोरा कॉलेज - निर्माण प्लाझा चौक - इंदिरा गांधी पुतळा चौक - बीजे कॉर्नर - कोर्ट चौक मार्गे परत सीताबाई थिटे कॉलेज येथे संपली. सुमारे तीन किलोमीटर अंतराच्या या दौडीदरम्यान 'एक भारत, श्रेष्ठ भारत', 'राष्ट्रीय एकता जिंदाबाद' अशा घोषणा देत वातावरण देशभक्तीने भारून गेले होते. दौड पूर्ण झाल्यानंतर प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवणाऱ्या विजेत्यांना ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमास शिरूर पोलीस ठाण्याचे अधिकारी, शिक्षकवर्ग, सामाजिक कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते. या निमित्ताने राष्ट्रीय एकतेचा संदेश देत सर्व सहभागीनी देशातील एकता, अखंडता व बंधुभाव टिकवण्याचा संकल्प केला. शिरूर पोलिसांच्या पुढाकाराने झालेल्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.